D-3, Shri Shankar Nagari, Near Vanaz Company, Cosmos Bank,
Paud Road, Kothrud, Pune-411038.
8408026262 / 9422525024
sanjay.marne@yahoo.in / sanjay.marnee@gmail.com

SAVE HONEYBEE'S

**Indian Natural Honeybees**

दिनांक: 29/ 04 / 2026

प्रति,
माननीय संचालक
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,
मध संचालनालय,
महाबळेश्वर जिल्हा-सातारा

## मधमाशी पालन राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम समारंभ लाभार्थी आवेदन पत्र



१. लाभार्थी संपूर्ण नाव : संजय बाबुराव मारणे
इंडियन नॅचरल हनीबीज, पुणे
२. लाभार्थी संपूर्ण पत्ता : श्री शंकरनगरी, वनाझ कंपनीजवळ, पौड रोड, कोथरूड, पुणे - ४११०३८
३. जन्म दिनांक : 13/09/1962
४. वय : 64
५. शिक्षण : B.Com
६. जात : Hindu Maratha
७. आधार कार्ड क्रमांक :755012859378
८. मोबाईल क्रमांक : 9422525024/8408026262
९. मधमाशी पालन उद्योगाचे प्रशिक्षण घेतलेल्या संस्थेचे नाव :

A] केंद्रीय मधुमक्खी अनुसंधान एवं प्रशिक्षण संस्था पुणे दिनांक 3 जानेवारी 2022 ते 7 जानेवारी 2022 अल्पावधी मधुमक्खी पालन

B] केंद्रीय मधुमक्खी अनुसंधान एवं प्रशिक्षण संस्था पुणे दिनांक 17

फेब्रुवारी 2022 मध टेस्टिंग किट प्रशिक्षण

C] BAIF वाघोली मांजरी खुर्द दिनांक 4 मार्च 2022 डंकहीन मधमाशी पालन प्रशिक्षण

D] केंद्रीय मधुमक्खी अनुसंधान एवं प्रशिक्षण संस्था पुणे दिनांक 13 जून 2022 ते 14 जून 2022 डंकहीन मधमाशीपालन प्रशिक्षण

E] दिनांक 15 व 16 फेब्रुवारी 2024 नॅशनल सेमिनार ऑन सायंटिफिक बीकीपिंग प्रशिक्षण, हैदराबाद

F] केंद्रीय मधुमक्खी अनुसंधान एवं प्रशिक्षण संस्था पुणे दिनांक 10 जून 2024 ते 14 जून 2024 अल्पावधी मधुमक्खी पालन

G] कृषी विज्ञान केंद्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र ओपन युनिव्हर्सिटी नाशिक दिनांक 3 फेब्रुवारी ते 9 फेब्रुवारी 2025 वैज्ञानिक मधमाशी पालन (Scientific Beekeeping) प्रशिक्षण

१०. मधमाशी पालन उद्योगाच्या सुरुवातीस असणाऱ्या मधपेट्यांची संख्या :
सुरुवातीस : मेलीफेरा 5 सातेरी 5 स्टिंगलेस मधमाशी 2 पेट्या

११. सध्या उपलब्ध असणाऱ्या मधपेट्यांची संख्या :
सध्या : मेलीफेरा 200 सातेरी 15 स्टिंगलेस मधमाशी 225 पेट्या

१२. राणी पालन कार्यक्रम राबवून तयार केलेल्या वसाहतींची संख्या :
स्टिंगलेस मधमाशी 50+ वसाहती

१३. वसाहतीसह मधपेट्यांची विक्री संख्या:
मेलीफेरा 35 सातेरी 9 स्टिंगलेस मधमाशी 204 पेट्या

१४. प्रतिवर्षी मधाचे संकलन (किलो/ग्रॅम) :
`अंदाजे 1000+ किलो

१५. प्रतिवर्षी मधाची विक्री (किलो/ग्रॅम) :
अंदाजे 900+ किलो

१६. स्वतःचा मधाचा ब्रँड तयार केला आहे का?
होय ब्रँड नाव : Indian Natural Honeybees

१७. शेती पिकांच्या परागीभवनासाठी केलेल्या मधपेट्यांची संख्या :
170 पेट्या (शेतकऱ्यांना सेवा दिलेली)

१८. मधमाशीद्वारे परागीभवन होऊन वाढलेले पीक उत्पादन :
शेतकऱ्यांच्या उत्पादनात 20% ते 40% वाढ झाल्याचे निदर्शनास आले

१९. ५ वर्षात मंडळाला विक्री केलेला मध :

दिनांक 20 /4 /2026 रोजी मध पुरवठ्याबाबत माननीय संचालक महाबळेश्वर यांना पत्र देण्यात आलेले आहे

## २०. सामाजिक कार्याविषयी माहिती :

**वनतारा देखावा उद्घाटन समारंभ व मधमाशी जागरूकता उपक्रम**

**दिनांक : ८ सप्टेंबर २०२४**

**ठिकाण : गणेश मंदिर, २४७ कसबा पेठ, पुणे**



त्वष्टा कांसार समाज संस्था, पुणे व त्वष्टा कांसार समाज गणेशोत्सव, पुणे यांच्या वतीने आयोजित वनतारा देखावा - जंगली प्राण्यांचे पुनर्वसन करणारा प्रकल्प याचा उद्घाटन समारंभ रविवार दि. ८ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी 7.00 वाजता संपन्न झाला.

या सोहळ्याचे उद्घाटन वनअधिकारी व इंडियन नॅचरल हनीबिज, पुणेचे संचालक श्री. संजय मारणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

समारंभात श्री. मारणे यांनी मधमाश्यांचे पर्यावरणीय महत्त्व, त्यांचे संवर्धन व शेतीतील योगदान याबाबत माहिती दिली. यानिमित्ताने गणेशोत्सवाच्या सार्वजनिक वातावरणात मधमाश्यांवर आधारित माहितीपर बॅनर्स प्रदर्शित करून “Save the Honeybees” हा उपक्रम राबविण्यात आला.

या विशेष उपक्रमामुळे उपस्थित भाविक, कार्यकर्ते व गणेशभक्त यांना मधमाश्या व निसर्ग संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली.

🌿 🐝 समाजकार्यातून पर्यावरण रक्षणाचा संदेश पोहोचविल्याबद्दल श्री. संजय मारणे यांचे अभिनंदन करण्यात आले.



दि. २६ जानेवारी २०२४, निसर्गस्नेही कार्यकर्त्यांना पुरस्कार; उपस्थितांना मधमाशी माहिती व टेबल कॅलेंडर वितरण.

## २४ जानेवारी २०२४ - पर्यावरण कट्टा



पुण्यातील वनराई संस्था मार्फत विविध संस्था एकत्र येऊन कार्यक्रम; सहभागी सदस्यांना मधमाशी माहिती व कॅलेंडर/ब्रॉशर्स दिले.शाळा/महाविद्यालय प्रदर्शन

## १८ फेब्रुवारी २०२४ - नेल फ्री ट्री उपक्रम (Director Patil & Dhumal)





पौड रोडवरील झाडांवरील खिळे व साहित्य काढले; टीमला मधमाशी माहितीपत्रके दिली; Save the Honeybees उपक्रम यशस्वी.

१८ एप्रिल २०२४ - World Book Day (Sakal Present)

स्वयं लायब्ररी सेल्फी स्पर्धेत २००+ पुस्तके दाखवली, त्यात ५० मधमाशीवरील पुस्तके/ब्रॉशर्स होत्या; निकाल २७ एप्रिल २०२४ रोजी जाहीर; पुरस्कार व भेटवस्तू 7.

१७ नोव्हेंबर २०२४ - Krida Maharshi Haribhau Sane Pratisthanवितरित.



१६ जून २०२५ - Vasundhara Foundation

श्री. भोसले यांनी पर्यावरणस्नेही कार्यकर्त्यांना Mrs. Mamta Tai Sankpal यांच्या हस्ते गौरव पुरस्कार २०२५ प्रदान; लघुपट प्रदर्शन; उपस्थितांना मधमाशी माहिती दिली; एकत्र काम करण्याचा प्रस्ताव यशस्वी.



श्री. सयाजी शिंदे (चित्रपट अभिनेता, देवराई फाउंडेशन)

दि. १७ ऑक्टोबर २०२२, पुणे वनविभाग भेट; मधमाश्यांबाबत माहिती दिली; उपक्रमाचे कौतुक व प्रेरणा.

Indian Natural Honeybees Pune मार्फत मधमाशी पालन क्षेत्रात सक्रिय कार्य करण्यात येत आहे. शेतकरी, महिला व युवकांना प्रशिक्षण देऊन स्वावलंबनासाठी प्रोत्साहन दिले जाते.

परागीभवनामुळे शेती उत्पादन वाढते याबाबत जनजागृती केली जाते. शुद्ध मध व उपपदार्थांच्या उत्पादनातून ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करण्यात मदत केली जाते.

## २१. मध उद्योगाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी केलेले कार्य :

Indian Natural Honeybees, Pune या संस्थेकडून वर्ष 2024 आणि 2025 मध्ये पुणे येथील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मधमाशांबाबत जागरूकता (Awareness) कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या उपक्रमांतर्गत सुमारे 2000 विद्यार्थ्यांना मधमाशांचे महत्त्व, जीवनचर्या आणि पर्यावरणीय योगदान याबाबत माहिती देण्यात आली.



विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या, जसे की:
• चित्रकला (Drawing) •निबंध लेखन (Essay Writing) • रांगोळी (Rangoli)
• वादविवाद (Debating) • सेल्फी स्पर्धा (Selfie Competition)






- शाळा-कॉलेज मध्ये मधमाशी जागरूकता अभियान
  या स्पर्धा खालील शाळांमध्ये घेतल्या:






• विद्या विकास शाळा Pune • काशिनाथ Khutwad स्मारक शाळा Pune






• कै. बाबूराव Rairikar विद्यालय, उरवडे, Mulshi •सहजीवन मित्रमंडळ, सहकारनगर

एकूण 600 विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये भाग घेतला. सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रयत्नांसाठी ट्रॉफी व प्रमाणपत्रे (Trophy & Certificate) देण्यात आली. याशिवाय, विद्यार्थ्यांनी मधमाशांबाबत संवाद साधला आणि अनुभव घेतला, ज्यामुळे त्यांना या विषयावर सखोल शैक्षणिक माहिती आणि प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमाचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी देखील कौतुक व्यक्त केले. यामुळे "Save the Honeybees" उपक्रमाचा उद्देश यशस्वीरीत्या साध्य झाला.

## Basvant Madhmashi Udyan – Basvant Madhukranti Puraskar 2024

**ठिकाण:** Basvant Madhmashi Udyan, Pimpalgaon, Nashik

**दिनांक:** 23 डिसेंबर 2024



परागीभवन सेवा, ॲपिथेरपी बसवंत मधमाशी उद्यानाचा स्तुत्य उपक्रम

डॉ. एच. आर. भार्गव यांचे प्रतिपादन; 'मधुक्रांती' आणि 'पूर्वा कृषिदूत' पुरस्कारांचे वितरण

मधु उद्योजकांचा सन्मान

कार्यक्रम:

- Basvant Madhukranti Puraskar 2024 च्या कार्यक्रमात उपस्थित राहून उद्यानाची पाहणी करण्यात आली.
- Honeybee Udyan खूप चांगले आणि माहितीपूर्ण असल्याचे अनुभवले.
- श्री संजय मारणे यांनी उद्यानाचे निरीक्षण केले
- Mr. Pawar, Director, Basvant Udyan यांना Honeybee Protection व Conservation वर आधारित पुस्तक भेट दिले.
- यापूर्वी केलेले उपक्रम त्यांना माहिती करून दिले गेले; त्यांनी कार्यक्रमाबद्दल कौतुक व्यक्त केले आणि पुढील शुभेच्छा दिल्या.

उपस्थिती:

- विजय चौंडिकर (Retired ACF)
- इतर अधिकारी व सहभागी

थोडक्यात:

हा कार्यक्रम मधमाशी संवर्धन, उद्यान व्यवस्थापन आणि Honeybee Udyan च्या यशस्वी उपक्रमांचे प्रदर्शन करण्यासाठी आदर्श ठरला.

## तुंगी गाव - 14 डिसेंबर 2021



Mrs. Pathare यांनी 50 Bee Boxes Bachat Gut करून KVIC मार्फत प्रशिक्षण घेतले व स्वतःचा Honey Brand सुरू केला. दुर्गम भागातील मधमाशी व्यवसाय कौतुकास्पद आहे. Indian Natural Honeybees कडून अतिरिक्त माहिती दिली गेली.

Sahakarnagar – 27 जुलै 2024

- Mr. Nitin Patil यांनी 10 Bee Boxes KVIC च्या 50% Subsidy वर घेतले.
- Beekeeping सुरू केली व Honey Collection सुरु केले.
- Bee Boxes ची तपासणी केली; काम उत्कृष्ट चालले आहे.



- नैसर्गिक मधावर आधारित मूल्यवर्धित उत्पादनांची निर्मिती

  प्रशिक्षण शिबिरे व कार्यशाळा आयोजन

  शेतकऱ्यांना Bee Box वापर मार्गदर्शन

"Save Bees – Save Nature" जनजागृती

सोशल मीडिया व स्थानिक कार्यक्रमांद्वारे प्रचार मधमाशी पालन हा माझ्यासाठी फक्त व्यवसाय नसून निसर्गाशी नाते जोडणारा सेवाभावाचा उपक्रम आहे. यामुळे पर्यावरण संरक्षण, शेती उत्पादनातील वाढ आणि शुद्ध अन्ननिर्मिती यामध्ये थेट योगदान देता येते, हेच माझे सर्वात मोठे समाधान आहे.

मिळवून देणे या उद्देशाने सुरू करण्यात आली.मधमाशांचे पर्यावरणातील योगदान जनतेपर्यंत पोहोचवणे आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे हे प्रमुख ध्येय आहे.

- मधमाशी पालनाविषयी जनजागृती व मोफत मार्गदर्शन
  - शेतकरी व महिलांसाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यक्रम
  - शाळा-कॉलेजमध्ये Honeybee Awareness Sessions
  - परागीभवनाची माहिती व फळबागांमध्ये डेमो
  - नैसर्गिक मधमाशांवरील पुस्तिका, पोस्टर, कॅलेंडर प्रकाशन
  - मधमाशी प्रदर्शन आणि उपकरणांची माहिती
  - मधमाशी संवर्धनासाठी मोहीम व फुलझाड लागवड उपक्रम तलजाई टेकडी

## वृक्षारोपण कार्यक्रम

**ठिकाण: तलजाई टेकडी** **दिनांक: 29 जून 2024**



**मुख्य पाहुणे: माननीय श्री महादेव मोहिते, उपवनसंरक्षक**

**सहभागी: Retired वानकर्मचारी संघटना, पुणे**

**कार्यवाही:**

- एकूण 100 देशी वृक्षांचे रोपण केले.
- वृक्षांचे महत्त्व व त्यांची काळजी कशी घ्यावी याबाबत स्थानिक जनतेला मार्गदर्शन केले.
- कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला व स्थानिक वृत्तपत्रांत त्याची माहिती प्रसिद्ध झाली.

**भंबुरडा वनविहार टेकडी - आषाढी पालखी सोहळा निमित्त वृक्षारोपण**

**ठिकाण: भंबुरडा वनविहार टेकडी दिनांक: 4 जुलै 2024**

## ‘मधमाश्यांच्या संवर्धनासाठी देशी झाडे लावावीत’

पुणे, ता.३ : “मधमाश्यांचे संरक्षण आणि संवर्धनासाठी भारतीय वृक्ष मोठ्या प्रमाणात लावले पाहिजेत,” असे मत निवृत्त सहायक वनसंरक्षक व मधमाशी संशोधक संजय मारणे यांनी व्यक्त केले.

भांबुर्डा वनविहारात वृक्षारोपणाचा कार्यक्रम नुकताच झाला. कृषी उपसंचालक यशवंत केंजळे यांनी निवृत्तीनिमित्त आठ ते दहा फूट उंचीची झाडे भेट दिली होती. वड, पिंपळ, चिंच, आंबा, तुती, जांभूळ, आवळा आदी झाडे यावेळी लावण्यात आली. मारणे म्हणाले, की निलगिरी, सुबाभूळ, ग्लिरिसिडिया अशी विदेशी झाडे लावणे आपण बंद केले पाहिजे. ही झाडे पर्यावरणासाठी मारक असून पशुपक्षी आणि मधमाश्यांना त्याचा काही उपयोग होत नाही. यामुळे देशी झाडे लावून मधमाश्यांचे संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक आहे. निवृत्त महसूल



पुणे : आषाढी पालखी सोहळ्यानिमित्त भांबुर्डा वनविहारात वड, पिंपळाचे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी वृक्षमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते

आयुक्त शंकरराव सातव, निवृत्त पोलिस महासंचालक रामनाथ वाघ यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. यावेळी लेखक सुरेशचंद्र वारघडे, पांडुरंग आंग्रे, संजय मोतलिंग, शंकरराव धोत्रे, काकासाहेब लोढे, दीपाली लोढे, ममता तळवलकर, राजेंद्र ठाणगे, टिपाराम धनारिया, छगन नेटके, शिवशंकर, बनगर, कमलाकर अहिवरे, योगेश गावकर उपस्थित होते. यशवंत केंजळे यांनी आभार मानले.

**मुख्य पाहुणे: ज्येष्ठ पत्रकार सुरेशचंद्र वारघडे, निसर्गप्रेमी 40 जण सहभागी: स्थानिक 50 वृक्षप्रकारांचे रोपण (Ficus, वड, पिंपळ, उंबर, लिम्ब इत्यादी**

**श्री संजय मारणे, Director, Indian Natural Honeybees, Pune यांनी मधमाशांबाबत माहिती दिली. सहभागी लोकांनी “Save the Honeybees” आणि “Save Trees” यांची शपथ घेतली. हा उपक्रम स्मरणीय ठरला व वृत्तपत्रांत प्रसिध्द झाला.**

### वृक्षारोपण व मधमाशी संवर्धन उपक्रम -

**दिनांक: २५ जानेवारी २०२५**

**ठिकाण: खडकवासला धरण प्रकल्प, गोरहे मटाले वस्ती**

**Green Thumb तर्फे आयोजित Tree Plantation Program अंतर्गत गोरहे मटाले वस्तीमध्ये वृक्षारोपणाचे उपक्रम राबवले गेले. या कार्यक्रमास Mr. Patil (Lt. Colonel) आणि प्रकल्पाशी संबंधित टीम उपस्थित होती.**

**उपक्रमात सहभागी सदस्यांनी धरणातील माती तपासणे, झाडांची लागवड व देखभाल यासंबंधी कामे पाहिली.**



श्री. Patil यांनी मधमाश्यांच्या परागीभवनासाठी योग्य जागा ठरविण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानुसार एकूण १० Stingless Honeybees Box स्थापित केले गेले. सुरुवातीला २ Box स्थापित केले गेले, त्यावेळी Cummins कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. नंतर उर्वरित ८ Box स्थापित करून एकूण १० Box स्थापन केले गेले.

उपस्थितांनी "Save the Honeybees" व निसर्ग संवर्धन उपक्रमाचे कौतुक केले व हा उपक्रम विशेष समाधानकारक असल्याचे व्यक्त केले.

🌿 🐝 निसर्ग रक्षण व मधमाशी संवर्धनाचा संदेश

🌿 🐝 Tree Plantation – पर्यावरण संवर्धनाचा संगम

## Biodiversity एक दिवसीय कार्यशाळा - बावधन (Forest Land)

## ठिकाण: बावधन, वनक्षेत्र

## दिनांक: 17 जुलै 2024

मुख्य पाहुणे व अधिकारी:

- माननीय PCCF, नागपूर - श्री Tembhurnikar
- Mr. N.R. Praveen, CCF, Pune
- इतर वनविभागाचे अधिकारी आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी

कार्यक्रम:

- वन्यजीव उपचार केंद्रात विविध संस्था सहभागी होऊन आपली विचारमंडळे मांडली.




- PCCF यांनी मार्गदर्शन केले आणि वन्यजीव संवर्धनासंबंधी टिप्स दिल्या.
- श्री संजय मारणे, Director, Indian Natural Honeybees, Pune यांनी मधमाशांबाबत सविस्तर माहिती दिली आणि “Save the Honeybees” या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले.
- या प्रकल्पामुळे वन्यजीव संवर्धन व मधमाशी संवर्धन यासाठी नवीन प्रकल्प राबवता येतील असे नमूद केले.
- Forest Training Centres ला प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याचे सांगितले; Kundal येथे प्रशिक्षण दिले असून इतर केंद्रांनाही प्रशिक्षण घेता येईल असे सूचना दिल्या.
- तसेच, रेस्क्यू सेंटरची पाहणी करण्यात आली.

थोडक्यात: हा कार्यक्रम वन्यजीव संवर्धन, मधमाशी संवर्धन आणि प्रशिक्षण केंद्रांना मार्गदर्शन या उद्दिष्टाने अत्यंत यशस्वी झाला.

## कै. बाबुराव रायरीकर विद्यालय, उरवडे (SSC/HSC) व आंबेगाव जिल्हा परिषद शाळा (बालवाडी ते ४वी)

दि. २६ जानेवारी २०२३ पासून दरवर्षी विद्यार्थ्यांचा वार्षिक गौरव (ट्रॉफी व रोख रक्कम) माझे वडील कै. बाबुराव माधवराव मारणे यांच्या स्मरणार्थ दिला जातो.



## लातूर - 18 जुलै 2025



Krushi Vidnyan Kendra, Latur येथे Mr. Dnyaneshwar Malile यांनी thevalele 50 Melifera Bee Boxes ची पाहणी केली.Honeybees चे Pollination कार्य उत्कृष्ट झालेले दिसले. Mr. Deshmukh (KVK Latur) उपस्थित होते.

Mr. Malile यांचे 1700 Bee Boxes राजस्थानमध्ये आहेत;Government ने NHBM द्वारे Queen Bee साठी Quality Nucleus Stock Development Centre प्रकल्प मंजूर केला व Finance दिला.उत्कृष्ट काम; अभिनंदन व Hats Off!

## दिनांक: 30 जानेवारी 2022

- Beekeeping साठी 5 Cerena Bee Boxes खरेदी केले.
- माझ्या संकुश्री Farm मध्ये ठेवून आठवड्यातून 2 वेळा तपासणी करत होतो. Honeybees चांगले काम करत होत्या.



फेब्रुवारी / मार्च 2022:

- Honeybees चे 2/3 वेळा Swarming झाले.
- Swarming नेट द्वारे गोळा करून पुन्हा Box मध्ये सोडले.
- हा practical अनुभव खूप चांगला झाला.

KVIC Site Visit:

- Mr. Panvencha यांनी Site Visit केली; काम चांगले चालले होते.
- 4/5 महिन्यांत एकेक Honeybee Swarming झाले, पण मी धीर धरला.

## प्रशिक्षण आणि जनजागृती:

- नंतर Books लिहिणे, Brochure तयार करणे, Awareness Programs चालवणे सुरू केले.
- Students आणि Farmers यांना Honeybees बाबत माहिती दिली.
- Refresh Training Courses 2023-24 पासून सुरू केले.

## Beekeeping प्रॅक्टिस:

- Cerena Indica, Melifera आणि Stingless Honeybees Boxes बाबत Farmers आणि संस्था यांना Personal Supply सुरू केले; उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.
- आतापर्यंत Cerena Indica , Melifera , Stingless Honeybees (एकूण170 Boxes) विकले.
- Small Quantity मध्ये Honey, Pollen आणि Royal Jelly Capsules विकत आहे; अनुभव उत्कृष्ट झाला.

2025 ची प्रगती:

- स्वतःच्या Melifera चे 200 Bee Boxes राजस्थानमध्ये ठेवले आहेत.
- Retirement नंतरही "Save the Honeybees" या उपक्रमावर अभिमान वाटतो.

६. मधमाशी पालनावर कार्य करताना आलेल्या समस्या आणि त्यांचे निराकरण

- मधमाशी पालन करताना मला विविध प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागला. सुरुवातीला हवामानातील बदल ही मुख्य समस्या होती. उन्हाळ्यात अतिउष्णता आणि पावसाळ्यातील आर्द्रतेमुळे वसाहती कमजोर होत होत्या. यासाठी

मी बॉक्स सावलीत ठेवणे, पावसाळ्यात उंचावर ठेवणे आणि Sugar Syrup व Pollen Substitute देऊन पूरक आहार देणे हे उपाय केले. त्यामुळे वसाहतींची ताकद पुन्हा वाढली आणि ही समस्या पूर्णपणे नियंत्रणात आली.

- फुलधारा कमी पडण्याची अडचणही वारंवार जाणवत होती. काही प्रदेशात फुले नसल्याने मधमाश्या उपाशी राहण्याची शक्यता होती. हे टाळण्यासाठी मी योग्य वेळी बॉक्स स्थलांतर केले, फुलझाडे लावली आणि Supplement Feeding सुरू ठेवली. यामुळे उत्पादन टिकून राहिले आणि फुलधारा समस्या सुटली.

- Varroa mite, Wax moth, Small hive beetle आणि Nosema यांसारख्या कीटकांमुळे वसाहती अस्वस्थ होत होत्या. नियमित 7-10 दिवसांनी निरीक्षण करून, Formic Acid / Oxalic Acid वापरून Varroa नियंत्रण केले, रिकाम्या फ्रेम्स फ्रीजमध्ये ठेवून Wax moth नियंत्रण केले आणि स्वच्छता वाढवली. या उपाययोजनांमुळे सर्व कीटक नियंत्रणात आले आणि वसाहती पुन्हा मजबूत झाल्या.

- राणी मधमाशी कमजोर झाल्याने काहीवेळा वसाहतीची प्रगती थांबत असे. यासाठी मी Requeening करून नवीन राणी बसवली, ज्यामुळे ब्रूड पॅटर्न सुधारला आणि वसाहती पुन्हा जोमात आल्या.
- शेतातील कीटकनाशक फवारणीमुळे काही वेळा मधमाश्या मरत होत्या. मी शेतकऱ्यांशी समन्वय ठेवून फवारणी संध्याकाळी करण्यास सांगितले आणि वसाहती सुरक्षित अंतरावर हलवल्या. त्यामुळे भविष्यात असे नुकसान झाले नाही.

- मुंग्या, उंदीर, आवाज, धूर, तसेच बॉक्सची हलचाल यासारख्या बाहय अडचणींसाठी मी अँटी-ऍन्ट उपाय केले, बॉक्स स्टँडवर ठेवले, सुरक्षित जागा निवडली आणि आवश्यक तेव्हा प्रकाशयोजना केली. यामुळे या समस्या देखील पूर्णपणे दूर झाल्या.

योग्य काळजी, निरीक्षण, शास्त्रीय उपचार, पूरक आहार, स्थलांतर आणि स्वच्छता यांच्या मदतीने मधमाश्यांवरील सर्व अडचणींचे मी यशस्वीरीत्या निराकरण केले आणि वसाहती स्वस्थ व उत्पादक ठेवण्यात मला पूर्ण यश मिळाले.

७. मधमाशी पालन या व्यवसायामध्ये संस्थेचे पुढील नियोजन काय?

- Honeybee Tourism Center स्थापनेचा उपक्रम
- जिल्हानिहाय Bee Friendly Village प्रकल्प
- आधुनिक प्रशिक्षण व प्रमाणपत्र अभ्यासक्रम

- ग्रामीण महिलांसाठी घरगुती मधमाशी पालन योजना
- वार्षिक Honeybee Science Exhibition
- डिजिटल माहिती प्लॅटफॉर्म व ऑनलाइन सल्ला केंद्र

## मधमाशी पालन प्रकल्प - ग्रामीण व आदिवासी गावांचा दौरा

### 1. Manghar गाव, महाबळेश्वर, सातारा

तारीख: 7 जानेवारी 2025

श्री नितीन पाटील (Beekeeper), श्री राजेश दातार (सहकारनगर, पुणे) yanche sobat pahani keli

- KVIC तर्फे गावातील कुटुंबांना मधमाशी पालन व्यवसायाचे प्रशिक्षण दिले गेले.
- प्रत्येक कुटुंब मध विक्रीद्वारे उत्पन्न मिळवत आहे, ज्यामुळे दुसरी कमाई आणि रोजगाराची संधी निर्माण झाली.

### 2. अंधारवाडी, ता. केळापूर, जि. यवतमाळ

- तारीख: 28 जुलै 2025



- आदिवासी तरुण व महिलांनी Bee Boxes बसवून नैसर्गिक मध उत्पादनास सुरुवात केली.
- संजय Marne (माजी सहाय्यक वनसंरक्षक, पुणे) व Indian Natural Honeybees, Pune यांनी मार्गदर्शन केले; सोबत श्री खरात व श्री कांबळे उपस्थित

होते.

- स्थानिक "आग्या मोहळ" व "सातेली मधमाशी" जातींच्या संवर्धनावर विशेष लक्ष दिले.
- ग्रामस्थांना प्रोत्साहन देऊन आत्मनिर्भरतेकडे वाटचाल साधली.

### 3. भविष्यकालीन योजना

सरकारने घोषित केलेल्या गावांना भेट देऊन मधमाशी पालनाबाबत मार्गदर्शन, Awareness Training, Bee Boxes आणि उत्पादन सहाय्य देण्याचे नियोजन:

- Patgaon (Bhudargad, कोल्हापूर)
- Bhandarwadi (Kinvat, नांदेड)
- Kakaddabha (Aundhanagnath, हिंगोली)
- Udadavane (अकोले, अहिल्यनगर)
- Sindhi Vihir (Karanja, वर्धा)
- Amazari (चिकलदरा, अमरावती)
- Gholvad (Dahanu, पालघर)
- Borzar (नवापूर, नंदुरबार)
- Chakore (Timbakeshwar, नाशिक)
- Shelmoha (गंगाखेड, परभणी)
- Saloshi (महाबळेश्वर, सातारा)

योग्य मार्गदर्शन व इच्छाशक्ती असल्यास ग्रामीण व आदिवासी भागात मधमाशी पालन व्यवसायातून उत्पन्न वाढ व रोजगार निर्माण करणे शक्य आहे.

Indian Natural Honeybees, Pune या संस्थेकडून गावांना भेट देऊन Awareness Training, Bee Boxes आणि उत्पादन मार्गदर्शन करण्याचे ठोस नियोजन केले आहे.

## Scientific Beekeeping प्रशिक्षण अनुभव

मी दिनांक ३ ते ९ फेब्रुवारी २०२५ दरम्यान कृषी विज्ञान केंद्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित Scientific Beekeeping या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी झालो.

या प्रशिक्षणातून मला मधमाशीपालनासंबंधी महत्त्वपूर्ण व शास्त्रीय माहिती मिळाली.




या प्रशिक्षणानंतर मला प्रशिक्षण प्रमाणपत्र (Certificate) देण्यात आले.

विशेषतः -

- मधमाश्यांचे शास्त्रीय व्यवस्थापन • मध उत्पादनाची प्रक्रिया
- परागीकरणाचे महत्त्व व पिकांवरील परिणाम • मध व इतर उत्पादनांचे संकलन, प्रक्रिया व साठवणूक
- मधमाश्यांचे रोग, शत्रू व त्यावरील उपाययोजना • विपणन व व्यवसाय व्यवस्थापन

या सर्व बाबींमध्ये प्रॅक्टिकल हाताळणी करून दाखवण्यात आली.

यामुळे मला मधमाश्यांविषयी सखोल व शास्त्रीय ज्ञान मिळाले असून, मधमाशीपालन व्यवसाय अधिक प्रभावी व विश्वासार्ह पद्धतीने करण्याचा आत्मविश्वास वाढला आहे. 🐝🌱

## ८. मधमाशी पालनामध्ये संस्थेने केलेले उल्लेखनीय काम, त्याला मिळालेले प्रतिसाद याबद्दल माहिती

- Maharashtra Agrovision, Agriculture Conferences, Colleges यामध्ये संस्थेला विभागीय पातळीवर सत्कार आणि प्रशस्तीपत्रे

राज्यस्तरीय मधुमित्र पुरस्कार - २०२४

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय मधुमित्र पुरस्कार - २०२४ या सोहळ्यात, मधमाशीपालन क्षेत्रातील

उल्लेखनीय व उत्कृष्ट कार्याबद्दल मला - श्री. संजय मारणे (Former Assistant Conservator of Forest, Pune Division) – यांना सन्मानपत्राने गौरविण्यात आले. हा मानाचा पुरस्कार मा. अध्यक्ष श्री. रवींद्र साठे (राज्यमंत्री दर्जा) तसेच सौ. आर. विमला (IFS), मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या शुभहस्ते दि. २६ जून २०२४ रोजी साखर संकुल, कृषी आयुक्तालय येथे प्रदान करण्यात आला. हा माझ्यासाठी अत्यंत अभिमान व आनंदाचा क्षण होता.




यावेळी राज्यभरातील इतर मान्यवर मधपाळ (Beekeepers) यांनाही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यात मी उपस्थित सर्व १२ अधिकारी यांना माझे लिखित पुस्तक "Honeybee Protection & Conservation" भेट दिले. त्यांनी या पुस्तकाचे मनापासून कौतुक केले व माझे मनोबल वाढविले. यासाठी मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

## रक्तदान शिबिर - वृत्तांत

दिनांक : 10 ऑगस्ट 2024

ठिकाण : आकांक्षा प्रतिष्ठान संचलित श्री साईनाथ ब्लड सेंटर, कोंढवा

आकांक्षा प्रतिष्ठानच्या वतीने कोंढवा येथे आयोजित रक्तदान शिबिरात एकूण 20 जणांनी रक्तदान करून मोलाचा सहभाग नोंदविला.

या उपक्रमासाठी इंडियन नॅचरल हनीबिज, पुणेचे संचालक श्री. संजय मारणे यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी रक्तदात्यांना राष्ट्रीय मदत कार्याचे महत्त्व समजावून सांगितले तसेच मधमाश्यांचे संवर्धन आणि निसर्गरक्षण याबाबत माहिती दिली.

श्री. मारणे यांनी रक्तदात्यांना सांगितले की -

"रक्तदानाने जसा जीव वाचतो, तसाच मधमाश्यांच्या संवर्धनाने निसर्ग आणि शेती वाचते."

या उपक्रमामुळे समाजसेवा व पर्यावरण संरक्षणाचा संगम साध्य झाला. रक्तदाते आणि आयोजक यांनी या कार्याबद्दल विशेष समाधान व्यक्त केले.

🌿🐝 रक्तदान - जीवनदान

🌿🐝 मधमाशी संवर्धन - निसर्गरक्षण

राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन 2025-26 व मधुमक्षिका पालन जनजागृती व्याख्यान -

दिनांक: २४ एप्रिल २०२५

ठिकाण: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, येवली; राजा रघुनाथराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, भोर




सकाळच्या सत्रात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, येवली तसेच राजा रघुनाथराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, भोर येथे आणि संध्याकाळच्या सत्रात येवली येथे कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व Indian Natural Honeybees यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन 2025-26 व मधुमक्षिका पालन जनजागृती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

सदर व्याख्यान प्रसंगी मा. श्री. संजय मारणे, सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक वर्ग-1 यांनी विद्यार्थ्यांना मधमाशांचे महत्त्व, मधमाशांपासून मिळणारी विविध उत्पादने, रासायनिक शेतीमुळे मधमाशांना होणारा धोका याबाबत माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना मधमाशांचे संरक्षण करण्यासाठी प्रतिज्ञा घेण्यास प्रवृत्त केले.

कृषी विभागातर्फे:

- मंडळ कृषी अधिकारी भोर श्री. प्रशांत सरडे यांनी विषमुक्त अन्न का पिकवावे, नैसर्गिक शेती का करावी तसेच नैसर्गिक शेती करण्याचे फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले आणि पालकांना नैसर्गिक शेती करण्यास प्रेरित केले.
- ग्रामीण मंडळींना राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन योजना, नैसर्गिक शेतीची गरज व घटक याबाबत मार्गदर्शन केले.
- कृषी सहाय्यक कोमल बांदल यांनी कृषी विभागाच्या योजनांबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास कृषी सहाय्यक श्री. राम जाधव, कृषी सहाय्यक श्री. प्रथमेश दोडके व सहाय्यक श्री. अमर इदाते उपस्थित होते.



दैनिक राष्ट्र सह्याद्री

E-pepar - 25 Apr 2025 - Page 6

## राजा रघुनाथराव विद्यालयात मधुमक्षिका जनजागृती कार्यक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भोर :** शहरातील राजा रघुनाथराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग व इंडियन नॅचरल हनीबीज पुणे यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन २०२५/२६ कार्यक्रमांतर्गत मधुमक्षिका जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे प्राचार्य लक्ष्मण भांगे यांनी सांगितले.सेवानिवृत्त वनसंरक्षक संजय मारणे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी मंडल कृषी अधिकारी प्रशांत सरडे ,कृषी सहायक भोलावडे कोमल बांदल ,रामचंद्र जाधव ,प्रथमेश दोडके ,उपप्राचार्य वसंत गायकवाड ,प्रा.विक्रम शिंदे आदी उपस्थित होते.

🌿🐝 नैसर्गिक शेती व मधमाशी संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावणे आणि जनजागृती करणे.

- भारतीय मधमाशांवरील संस्थेचे कॅलेंडर, माहिती पुस्तिका, शैक्षणिक साहित्य यांना राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद
- Pune, Sangali,Nashik, Vidarbha,Chatrapati Sambhajinagar येथे घेतलेल्या Awareness Programs मध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग
- अनेक शेतकऱ्यांनी संस्थेच्या मार्गदर्शनामुळे मधमाशी पालन यशस्वी केले व उत्पादन वाढवले - त्यांचे आभार व्यक्त करणारे संदेश प्राप्त झाले

🌿 2020 पासून जीवामृत उपक्रमाची सुरुवात

जीवामृत तयार करून नैसर्गिक खत वापरणे सुरू केले. त्यामुळे रासायनिक खतांचा वापर कमी झाला आणि मधमाश्यांचे संरक्षण साध्य झाले. 🐝




🌱 जीवामृत (SPNF द्रव खत) - थोडक्यात माहिती

साहित्य (200 लि. ड्रमसाठी):

गोमूत्र 10 लि., शेण 10 कि., गूळ 1 कि., बेसन 1 कि., माती 500 ग्रॅम, पाणी 200 लि.

तयारी: सर्व साहित्य मिसळून ड्रम सावलीत ठेवा. दररोज सकाळ-संध्याकाळ ढवळा. 72 तासांत तयार.

वापर:
- फवारणी: गाळून पिकांवर.
- सिंचन: 200 लि. = 1 एकर.
- टेरेस/किचन गार्डन, शोभेची झाडे.

फायदे:
- मातीतील सूक्ष्मजीवांची वाढ.
- रासायनिक खत व कीटकनाशक खर्च कमी.
- पीक निरोगी, पर्यावरण पूरक.

उत्पादन क्षमता:
- महिन्याला 1000 लि.
- वार्षिक (12 महिने) = 12,000 लि. जीवामृत तयार झाले.

व्यवसाय संधी (पुणे):

1, 5, 25 लि. कॅनमध्ये विक्री.

ग्राहक: गार्डनिंग ग्रुप, नर्सरी, शेतकरी, अपार्टमेंट सोसायटी.

कौतुकपर नोंद

दिनांक : ३ डिसेंबर २०२३

कुमारी राठी टेंबे, कॉलेज विद्यार्थीनी यांनी SEE प्रोजेक्ट अंतर्गत नैसर्गिक खत - जीवामृत या विषयावर व्हिडिओ स्वरूपात प्रकल्प सादर केला.

या प्रकल्पामध्ये :
- जीवामृत तयार करण्याची पद्धत,
- त्याचा शेतीत वापर,

- पर्यावरणपूरक फायदे,
- तसेच मधमाश्यांचे संरक्षण या दोन्हींचा संबंध स्पष्ट करण्यात आला.

या व्हिडिओ प्रकल्पामुळे कॉलेजमधील इतर विद्यार्थ्यांमध्ये नैसर्गिक खत व शाश्वत शेतीबाबत जागरूकता निर्माण झाली.

🌱🐝 असा आगळावेगळा, निसर्गपूरक आणि समाजोपयोगी उपक्रम खरोखरच स्तुत्य आणि अनुकरणीय आहे.

नैसर्गिक शेती + मधमाश्यांचे संरक्षण = शाश्वत शेतीचे भविष्य

## शाळा-कॉलेजमध्ये Honeybee Awareness Sessions

हनीबी प्रशिक्षण कार्यक्रम - अहवाल

दिनांक : 10 जानेवारी 2024

महाविद्यालय : समाजभूषण बाबुराव ऊर्फ अण्णासाहेब जधे महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न

सहभागी : NSS चे 70 विद्यार्थी




कार्यक्रमाचे विवरण :

भोर येथे महाविद्यालयातील 70 NSS विद्यार्थ्यांसाठी विशेष Honeybee Training Program आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात -

- 🐝 मधमाशींचे प्रकार, जीवनचक्र, परागीभवनातील भूमिका व त्यांचे पर्यावरणातील महत्त्व याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.
- 🛠️ Beekeeping Equipment ची माहिती व त्यांचा प्रत्यक्ष वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.
- 🧑‍🎓 विद्यार्थ्यांबरोबर थेट संवाद साधत Question–Answer Session

घेण्यात आले.

- 🧑‍🏫 NSS शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक करत, “हा Save the Honeybees चा उपक्रम स्तुत्य आहे” असे मत व्यक्त केले.
- 🙏 सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे “Save the Honeybees” ची शपथ घेतली.
- 🌿 स्थानिक ग्रामपंचायतीनेही या कार्यक्रमाला पाठिंबा देत Honeybee Awareness उपक्रमाचे स्वागत केले.

या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये मधमाशी संवर्धन, पर्यावरण जतन व शाश्वत शेती या बाबतीत जागरूकता निर्माण झाली. सर्वांनी हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी व प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

- सोशल मीडियावर Indian Natural Honeybees Pune या नावाने माहितीचे व्हिडिओ, पोस्ट, स्लाइड्स व शैक्षणिक सामग्री
- विविध सरकारी कार्यक्रम, कृषी प्रदर्शनात मॉडेल, फ्लेक्स, माहिती पुस्तिका, कॅलेंडर, घडीपत्रिका
- मोफत सल्लामसलत, कॉल हेल्पलाईन आणि फील्ड भेटी

या सर्व माध्यमांतून मधमाशी पालनाचा प्रसार प्रभावीपणे करीत आहे.

२. या क्षेत्राचा प्रसार होण्यासाठी आपण राबविलेली वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना, पद्धत व उपक्रमांची माहिती

मधमाश्यांबाबत फॉरेस्ट विभागासाठी प्रशिक्षण उपक्रम

फॉरेस्ट विभागातील गार्ड, फॉरेस्टर आणि रेंज फॉरेस्ट ऑफिसर यांना मधमाश्यांबाबत माहिती देऊन प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्याच वेळी Mr. अमित गोडसे यांनी मला भेटून, “फॉरेस्ट स्टाफला आपण मिळून प्रशिक्षण द्यावे” असा प्रस्ताव दिला.

त्याअनुसार मी पुणे, जुन्नर, सोलापूर, अहमदनगर, सातारा, सांगली व चिपळूण विभाग यांना प्रशिक्षणाबाबत पत्रे दिली. त्यानुसार सन 2022 मध्ये जुन्नर, सांगली आणि चिपळूण येथे प्रत्यक्ष जाऊन, सुमारे 200 फॉरेस्ट स्टाफला हनीबी विषयक सैद्धांतिक व प्रायोगिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणानंतर सर्वांना प्रमाणपत्रे (Certificates) देण्यात आली.

या उपक्रमामध्ये Mr. एन. आर. प्रविण (CCF, पुणे), Mr. Satpute, Mr. माने आणि Mr. खाडे

(DCF) यांनी मोलाचे सहकार्य केले.






या प्रशिक्षण उपक्रमाबद्दल दूरदर्शन व वृत्तपत्रांमध्ये विशेष बातम्या प्रकाशित झाल्या. समाजासाठी काहीतरी चांगले कार्य घडत असल्याचा आत्मिक समाधानाचा अनुभव आला. त्या काळात शिवनेरी, सिंहगड, लोणावळा आणि राजगडावर मधमाशांच्या हल्ल्याच्या घटना घडत होत्या. म्हणूनच पुढाकार घेत “Save The Honeybees” हा उपक्रम सुरू करण्यात आला.

6 मे 2025 – मुळशी पीडीसीसी बँक - तालुकास्तरीय खरीप हंगाम पूर्व कार्यशाळा



आयोजक: तालुका कृषी अधिकारी

चर्चा विषय:

- विषमुक्त, रसायनमुक्त व सेंद्रिय शेती
- माती-पाणी परीक्षण
- फळबाग लागवड
- पाणी फाउंडेशन
- मधुमक्षिका पालन (इंडियन नॅशनल हनी बीज, पुणे)

मार्गदर्शन: श्री संजय मारणे (सहाय्यक वनसंरक्षक, पुणे, सेवानिवृत्त)

सहभागी: सुमारे 100–125 शेतकरी

विशेष उपस्थिती: श्री चांदेरे (उपाध्यक्ष, पीडीसीसी बँक), श्री खाडे (तालुका कृषी अधिकारी), श्री राजेंद्र मारणे (सकाळ पत्रकार)

प्रकाशन: ह. चोंदे पाटील लिखित “होय, मी शेतकरी”परिणाम: शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती; अत्यंत समाधानी

10 मे 2025 – मुळशी तालुका शेतकरी संघ आयोजित मेळावा - कोलवण ग्रामपंचायत



फळबाग लागवड - आंबा, पेरू, जांभूळ, नारळ; लागवडीसंबंधी माहिती

सहभाग: सुमारे 50 शेतकरी

मार्गदर्शन:
- तालुका कृषी अधिकारी, मुळशी
- श्री राजेंद्र मारणे

मधमाशी पालन: इंडियन नॅशनल हनी बीज, पुणे - संचालक श्री संजय मारणे यांचे मार्गदर्शन; उत्पादन, प्रशिक्षण, प्रश्नोत्तर

उपक्रम: Save the Honeybees; शेतकऱ्यांनी सहभागाची इच्छा दर्शवली

परिणाम: शेतकऱ्यांनी फळबाग लागवड व मधमाशी पालन यास उत्सुकता दर्शवली; उत्पादन वाढीस मदत होईल अशी अपेक्षा; कार्यक्रम यशस्वी झाला

## जागतिक मधमाशी दिनानिमित्त उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव

२० मे २०२५ रोजी जागतिक मधमाशी दिनानिमित्त खादी आणि ग्रामोद्योग आयोग, मुंबई अंतर्गत सेंट्रल बी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (CBRTI), पुणे यांच्या वतीने मधमाशी संरक्षण, संवर्धन व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमात मनोजकुमार, अध्यक्ष खादी व ग्रामोद्योग आयोग, मुंबई यांच्या हस्ते मधमाशी संबंध व जनजागृती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना प्रशंसा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

तसेच, इंडियन नॅचरल हनीबीज, पुणे चे संस्थापक संजय मारणे यांना विशेष

गौरव प्राप्त झाला.

- “मधमाशी पुरस्कार” - उत्कृष्ट मधमाशी पालन, संरक्षण व उत्पादन क्षेत्रातील कार्याबद्दल
- Best Working बद्दल प्रशंसा प्रमाणपत्र

याचबरोबर इंडियन नॅचरल हनीबीज, पुणे तर्फे १५ मधमाशीपालकांना ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच, “वन्यजीव मित्र पुरस्कार” अंतर्गत सर्पमित्र म्हणून निसर्ग संवर्धन व आपत्ती व्यवस्थापनामध्ये विशेष योगदान देणाऱ्या १५ सर्पमित्रांचा गौरवही इंडियन नॅचरल हनीबीज, पुणे तर्फे करण्यात आला.

हा कार्यक्रम पर्यावरण संरक्षण, मधमाशी व वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी

जागतिक पर्यावरण दिन २०२५ - वृक्षारोपण व मधमाशी संवर्धन उपक्रम




आज दिनांक ५ जून २०२५, जागतिक पर्यावरण दिननिमित्त निसर्ग सेवा संस्था वारजे, वन विभाग पुणे, जी आय पुणे, महा एनजीओ फेडरेशन, लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ D2, रोटरी क्लब, ग्रीन हिल ग्रुप व Indian Natural Honeybees, Pune यांच्या संयुक्त विद्यमाने वारजे अरुण फॉरेस्ट येथे वृक्षारोपणाचा भव्य कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमात “मधमाशी वाचवा” या उपक्रमाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

ग्रीन हिल्स ग्रुप, पुणे यांनी ७ ते ९ जून २०२५ दरम्यान पर्यावरण दिनानिमित्त देवराई, घनवन, देववन, मधुवन, मृदा व जलसंवर्धन, वृक्षारोपण व प्रदर्शन या

संकल्पनेतून स्तुत्य उपक्रम राबविला.

या प्रदर्शनात Indian Natural Honeybees, Pune तर्फे बॅनर, माहिती फलक, उपकरणे व मधमाश्यांवरील विविध उत्पादने प्रदर्शित करण्यात आली. तसेच मधमाश्यांवरील पुस्तके व माहितीपत्रके पर्यावरण प्रेमींना भेट देण्यात आली. त्यांनी दिलेले मौल्यवान अभिप्राय “अभिप्राय पुस्तिकेत” नोंदवले गेले.याबद्दल Indian Natural Honeybees, Pune (संपर्क: ९४२२५२५०२४) तर्फे ग्रीन हिल्स ग्रुप व देववन संकल्पनेतील सर्व आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.




या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती मा. डॉ. नीलमताई गोऱ्हे (मंत्रालय, मुंबई) यांच्या शुभहस्ते झाले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास नवी दिशा व प्रेरणा मिळाली.

त्यांना Indian Natural Honeybees, Pune तर्फे “मधमाशी संरक्षण व संवर्धन” या पुस्तकाची भेट देण्यात आली व मधमाश्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत “हा अतिशय चांगला उपक्रम असून भविष्यासाठी महत्त्वाचा आहे” अशा शुभेच्छा दिल्या.

तसेच पुणे महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त मा. पृथ्वीराज सर व पुणे विभागाचे उपवनसंरक्षक मा. महादेव मोहिते सर यांच्या सहृदय उपस्थितीने कार्यक्रमाची शान अधिक वाढली. त्यांच्या सहकार्याबद्दलही मनःपूर्वक आभार.

## तालुका कृषी अधिकारी कार्यालय, घनसावंगी, जालना



"कृषी दिन" निमित्त घनसावंगी येथे शेतकरी सतीश Adhav यांच्या आयोजनाखाली मधमाशी विषयक विशेष जनजागृती कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमात Mr. सखाराम पावल (तालुका कृषी अधिकारी), संजय Marne (Indian Natural Honeybees, पुणे - माजी सहाय्यक वनसंरक्षक, पुणे) व एस. पी. काळे (माजी सहाय्यक वनसंरक्षक, जालना) यांनी शेतकरी व कृषी विभागातील कर्मचाऱ्यांना मधमाश्यांचे प्रकार, उत्पादने, परागीभवनाचे महत्त्व व व्यवसायिक मधमाशीपालन याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच CBRTI, KVIC विभागाच्या योजना (प्रशिक्षण, ५०% अनुदान, कर्ज सुविधा, PMEGP) यांची माहिती देण्यात आली.

शेतकऱ्यांसाठी प्रत्यक्ष पेटी व मध नमुने दाखवणे, प्रशिक्षण नोंदणीस प्रोत्साहन हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते.

हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरला.

## 5 जुलै 2025 – Care Foundation, कात्रज - Scientific Beekeeping प्रोग्राम




आयोजक: Care Foundation, श्री अवदुत कदम (Founder, कात्रज)

**मुख्य पाहुणे:** श्री संजय मारणे (Director, Indian Natural Honeybees, Pune)

**सहभाग:** 25 सहभागी participants

**क्रियाकलाप:** मधमाशी पालनासंबंधी माहिती, उत्पादन, प्रशिक्षण; प्रश्नोत्तर सत्र; सहभागींचा संवाद

**परिणाम:** सहभागींना उपयुक्त माहिती मिळाली; त्यांनी मार्गदर्शनाबद्दल आभार मानले; कार्यक्रम यशस्वी ठरला

## जागतिक सर्प दिन २०२५ - राज्यस्तरीय प्रशिक्षण व मेळावा

**१६ जुलै २०२५ | 📍 कृषी विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर**

**आयोजक:** Indian Natural Honeybees, Pune व स्वर्दशन सांस्कृतिक व सामाजिक संस्था (ग्रामीणोदय प्रकल्प), वाळूज



या मेळाव्यात सर्पमित्र, मधमाशीप्रेमी, जैविक शेती करणारे शेतकरी व पर्यावरणप्रेमींना मार्गदर्शन व प्रात्यक्षिके देण्यात आली.



**सर्पमित्र सोमनाथ येवले वन्यजीव मित्र पुरस्काराने सन्मानित**

नांदगाव । जागतिक सर्प दिन निमित्ताने इंडियन नॅचरल हनीबीज पुणे तसेच स्वरदर्शन सांस्कृतीक व सामाजिक संस्था (आमोदय प्रकल्प) वाळुंज, कृषी विज्ञान केंद्र छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण व मेळावा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये मधमाशी मित्र, सर्पमित्र व जैविक शेतकरी यांचा सत्कार करण्यात आला.

यात नाशिक जिल्ह्याच्या नांदगाव तालुक्यातील सोमनाथ येवले यांचा सर्पमित्र, वन्यजीव रक्षक उल्लेखनीय कार्यांची दखल घेत सत्कारासाठी निवड करण्यात आली. केंद्रीय अर्थमंत्री डॉ. भागवत कराड आणि सुवर्ण माने (भा.व.से.) उप वनरक्षक वनविभाग छत्रपती संभाजी नगर यांच्या हस्ते वन्यजीव मित्र पुरस्कार २०२५ ने सन्मानित होऊन गौरव करण्यात आला. सोमनाथ येवले यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. याप्रसंगी जिल्हा कृषी अधीक्षक प्रकाश देशमुख (कृषी विभाग) ज्योती, गायकवाड अध्यक्ष जैवविविधता समिती महाराष्ट्र शासन, डॉ. दीप्ती पाडगावकर कार्यक्रम समन्वयक, कृषी संवर्धन केंद्र छ. संभाजी नगर, संस्थेचे संस्थापक संजय मारणे, अविनाश गायकवाड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

प्रमुख मान्यवर मा. डॉ. भागवत कराड (केंद्रीय अर्थमंत्री), सौ. सुवर्णा माने (उपवनसंरक्षक), डॉ. दिप्ती पाटगावकर, डॉ. किशोर पाटक, डॉ. अनीता जिन्तूरकर, श्री. राहुल काळे (CBRTI, पुणे), श्री. पांडुरंग बामणे (APEDA), श्री. शिवाजी दहीवाल आदींची उपस्थिती लाभली.

**पुरस्कार व सन्मान: १५०+ सहभागींपैकी १३५ सर्पमित्र, मधमाशीप्रेमी व शेतकऱ्यांना Indian Natural Honeybees तर्फे ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. मान्यवरांना “सन्मान चिन्ह” प्रदान करण्यात आले.**

**हा कार्यक्रम सर्पसंवर्धन, मधमाशी संरक्षण व जैविक शेतीसाठी प्रेरणादायी ठरला.**

सकाळ

# मधमाश्या संपल्या तर जीवनचक्र कोलमडेल



## सात जिल्ह्यांमध्ये सर्पमित्रांच्या माध्यमातून संवर्धनाचे काम

घराच्या परिसरात किंवा शेतकऱ्यांच्या शेतात लागलेल्या मधमाश्यांच्या पोळ्यांकडे बहुतेकदा अडथळा म्हणूनच पाहिले जाते. परिणामी, टेंभे लावून ती पोळी जाळण्याचे प्रकार सर्रास घडतात. मात्र, हे करताना एक पोळे जाळणे म्हणजे प्रत्यक्षात एक गाव जाळण्यासारखे आहे. मधमाश्या या निसर्गाच्या परिपूर्ण जीवनचक्रातील एक महत्त्वाचा घटक आहेत. त्यांचे अस्तित्व संपले, तर आपले जीवनचक्र कोलमडून जाईल. त्यामुळे 'इंडियन नॅचरल हनीबीज'ही संस्था सात जिल्ह्यांत सर्पमित्रांच्या मदतीने मधमाश्यांचे संवर्धन करीत आहे. गेली अनेक वर्षे मधमाश्यांचे संवर्धन आणि पुनर्वसन यासाठी संस्था कार्यरत आहे. परिसरातील मधमाश्यांची पोळे जाळण्याऐवजी सुरक्षितरीत्या स्थलांतरित करून निसर्गातच सोडण्याचा उपक्रम संस्थेने सुरू केला.

**या ठिकाणी काम सुरू**

- धुळे
- शिर्डी (अहिल्यानगर)
- कोल्हापूर
- बदलापूर (ठाणे)
- पुणे
- बुलडाणा
- नाशिक



### मधमाश्यांचे प्रकार आणि वैशिष्ट्ये

- ☑ डॉरसाटा हनी बी किंवा रॉक बी (आग्या मोहोळाची माशी) : मोठ्या प्रमाणात पोळी बांधणारी ही माशी जंगलात आढळते.
- ☑ फुलोरी माशी : सामान्य म्हणून ओळखली जाते. एका पोळ्यात सुमारे ३० ते ४० हजार मधमाश्या असतात.
- ☑ भारतीय सातेरी माशी : झाडांच्या ढोलीत, उंबराच्या झाडाखाली किंवा दगड कपारीखाली पोळे बांधते.
- ☑ मेलीबेरा माशी : ही माशी पेटीमध्ये तयार करता येते, मात्र नैसर्गिकरीत्या क्वचितच आढळते.
- ☑ युरिपियन मेलीफेरा माशी : परदेशातून भारतात आणलेली ही माशी पेटीमध्येच वाढवली जाते. तिच्या पोळ्यात क्वीन सेल, कामगार माशी आणि नर माशी असे प्रकार असतात. राणी माशी दीड ते अडीच हजार अंडी दररोज घालते. नर माशी व कामगार माशीचे जीवन ४५ ते ९० दिवसांचे असते, तर राणी माशी तीन ते साडेतीन वर्षे जगते.

### शेतकऱ्यांनी काय करावे?

मधमाश्या मारण्याऐवजी त्या सुरक्षितरीत्या पकडून निसर्गात सोडाव्यात, यासाठी नागरिकांना आणि शेतकऱ्यांना जागरूक करणे गरजेचे आहे. यातूनच आपले अन्नसुरक्षा आणि पर्यावरण संतुलन टिकवता येऊ शकते. त्यासाठी मधमाशी रक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व सर्पमित्र, वनप्रेमी आणि ग्रामस्थांनी पुढे यावे, असे आवाहन निवृत्त सहायक वनसंरक्षक संजय मारणे यांनी केले.



“ मधमाशांमुळे परपरागीभवनाची प्रक्रिया सुरळीत पार पडते. या प्रक्रियेमुळे पिकांचे उत्पादन ३0 ते ३५ टक्क्यांनी वाढते. विशेषतः डाळिंब, भाजीपाला अशा नगदी पिकांसाठी मधमाश्यांचे अस्तित्व फारच महत्त्वाचे आहे. मधमाश्या नाहीत, तर शेतकऱ्यांचे उत्पन्नही घटेल

— **संजय मारणे**, निवृत्त सहायक वनसंरक्षक

संकलन : सुयेन जाधव

Aurangabad, Aurangabad-Today
23/07/2025 Page No. 8

# मधुमक्षिका पालन, प्रक्रिया उद्योगावर मंथन

**राज्यस्तरीय प्रशिक्षण, मेळाव्याला प्रतिसाद**

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर



**कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने मधुमक्षिका पालन, प्रक्रिया उत्पादने व यांच्या निर्यातीसंदर्भात नुकत्याच झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात मंथन झाले.**

जागतिक सर्प दिनानिमित्त कृषी व प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (आपेडा), इंडियन नचरल हनीबीज (पुणे), स्वरदर्शन सांस्कृतिक व सामाजिक संस्था (ग्रामोदय प्रकल्प, वाळूज) व पैठण रोडवरील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने मधुमक्षिका पालन, ताजी फळे, भाजीपाला व त्यांची प्रक्रिया उत्पादने यांच्या निर्यातीसंदर्भात नुकत्याच झालेल्या क्षमतावर्धन प्रशिक्षण कार्यक्रमात मंथन झाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक खासदार डॉ. भागवत कराड, उपवनसंरक्षक सुवर्णा माने, सेवानिवृत्त सहाय्यक वन संरक्षक संजय मारणे, अविनाश गायकवाड, ज्योती गायकवाड, शिवाजी दहिवाल, मानद वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाठक, कार्यक्रम समन्वयक डॉ. दिप्ती पाटगावकर, केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे कनिष्ठ कार्यकारी राहुल काळे, विषय विशेषज्ञ डॉ. अनिता जिंतूरकर, डॉ. संजुला भावर, डॉ. बस्वराज पिसुरे, अशोक निर्वळ आदींची उपस्थिती होती. सापांच्या जनजागृतीबद्दलचा कार्यक्रम उल्लेखनीय असून, असे कार्यक्रम नियमितपणे होणे गरजेचे असल्याचे मत डॉ. कराड यांनी नोंदवले. सुवर्णा माने म्हणाल्या, 'मधमाशी व सापांकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चाललेला आहे. त्यामुळे 'इकोसिस्टीम' जिवंत ठेवण्यासाठी मधमाशी आणि साप या दोन्ही वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे ही आजच्या काळाची गरज आहे'. या कार्यक्रमाचे सहआयोजक संजय मारणे यांनी मधुमक्षिका पालनासाठी राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. पाटगावकर यांनी कृषी विज्ञान केंद्रातील उपक्रमांची माहिती दिली. काळे म्हणाले, शेती उत्पादन वाढीसाठी तसेच जीवन चक्र सुरू ठेवण्यासाठी मधुमक्षिका महत्त्वाची आहे. त्यामुळे मधुमक्षिका पालनाचा व्यवसाय लाभाचा होऊ शकतो. बामणे यांनी 'अपेडा'ची कार्यपद्धती, अन्न निर्यात क्षेत्रातील योगदान, विविध योजना, 'गॅप'ची प्रक्रिया आणि अपेडा सदस्य नोंदणीची माहिती दिली. डॉ. जिंतूरकर यांनी नैसर्गिक शेतीचे आधारस्तंभ, मूलतत्वे आदींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. भावर यांनी फळमाशीमुळे होणाऱ्या नुकसानीबाबत, फळे-भाजीपाल्यावर योग्य फवारणी व संरक्षणासाठी लागणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली. त्यांनी सेंद्रिय कीड नियंत्रण, कीटकनाशकांचा सुरक्षित वापर व गुणवत्ता राखण्याचे उपाय यावरही मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी केव्हीकेतील किशोर शेरे, सतीश कदम, शिवा काजळे, जयदेव सिंगल, जयदीप बनसोडे, विशाल दाभाडे व इतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

**मधमाशी पालन प्रशिक्षण - ठिकाण: नांदुर्गा, तालुका उस्मानाबाद (औसा)**



**दिनांक: 18 जुलै 2025 (राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत, KVK लातूर) श्री. संजय मारणे**

**(माजी सहाय्यक वनसंरक्षक, पुणे) - शेतकरी व महिलांना प्रत्यक्ष फायदे व व्यवसायिक महत्त्व पटवून दिले.**

**श्री. देशमुख (KVK लातूर) - सेंद्रिय शेतीविषयी माहिती दिली.**

**🐝 महत्त्व:**

- **शेतीपूरक व फायदेशीर व्यवसाय**
- **उत्पादन व परागीभवन सुधारणा**
- **रोजगार व स्वावलंबनाची संधी**

**मुख्य मुद्दे:**

- **मधाचे प्रकार व उपयोग**
- **मधमाश्यांच्या जाती**
- **मध, पोलन, रॉयल जेली, प्रोपोलीस, मेण यांची माहिती**
- **पूरक व्यवसाय संधी**
- **परागीभवन व पर्यावरणाचे महत्त्व**

**या प्रशिक्षणामुळे १२५ महिलांना नैसर्गिक शेतीसोबत मधमाशी पालनाची प्रेरणा मिळाली.**

विशेष भेटवृत्त - गोसेवा प्रकल्प दिनांक : २९ जुलै २०२५

स्थळ : गोसेवा प्रकल्प, गवळाऊ धाम, आमगाव मदनी, जि. वर्धा



श्री. संजय मारणे (माजी सहाय्यक वनसंरक्षक, पुणे), श्री. खरात व श्री. मेंढे (माजी ACF) यांनी नंदू गावंडे यांच्या गोसेवा प्रकल्पाला भेट दिली.

🌱 वैशिष्ट्ये

- जैविक शेती : तूरडाळ, हरभरा डाळ, हळद
- गोशाळा : देशी गायींचे संगोपन, गावरान तूप, दूधाचे पेढे
- खत व्यवस्थापन : गांडूळखत, गोकृपाखत, गोकर्ण खत

🏆 गौरव

गोसेवा प्रकल्पास "जैविक शेती गौरव पुरस्कार" (१६ जुलै २०२५, KVK संभाजीनगर) प्रदान.

🐝 भविष्यातील दिशा

नंदू गावंडे यांनी लवकरच मधमाशी पालन सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला व बी बॉक्सची मागणी केली.

हा प्रकल्प पर्यावरणपूरक, टिकाऊ व प्रेरणादायी ठरत असून ग्रामीण सशक्ततेचा उत्तम आदर्श आहे.

नागपंचमी उपक्रम - भवानीपेठ, पुणे

दिनांक : 26 जुलै 2025 आयोजक : ओम फाऊंडेशन व इंडियन नॅचरल हनीबिज, पुणे



नागपंचमीच्या निमित्ताने ओम फाऊंडेशन व इंडियन नॅचरल हनीबिज, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भवानीपेठ झोपडपट्टी परिसरातील मुलांसाठी एक विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमात मुलांना मातीपासून सापांच्या प्रतिमा (चिकन सॉईल आयडल्स) तयार करण्याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. यामधून परंपरा, सण व पर्यावरणपूरक कृती यांची माहिती देण्यात आली.

त्याचबरोबर मुलांना मधमाश्यांचे महत्त्व, परागीभवनाची भूमिका, तसेच फुलपाखरांचे पर्यावरणातील योगदान याबाबत माहिती देण्यात आली. या साठी माहितीफलक (Information Boards) वापरले गेले. कार्यक्रमादरम्यान प्रश्नोत्तर सत्र आयोजित करण्यात आले ज्यात मुलांनी उत्साहाने भाग घेतला व आपली मते मांडली. एकूण ३० मुले या उपक्रमात सहभागी झाली. सर्वांनी सापांच्या प्रतिमा तयार करताना व माहिती घेताना आनंद व्यक्त केला.

हा उपक्रम मुलांसाठी शैक्षणिक तसेच मनोरंजक ठरला. छोट्या चॅम्प्ससाठी ज्ञान आणि सर्जनशीलता वाढवणारा हा सुंदर कार्यक्रम ठरल्याचे आयोजकांनी सांगितले.

**रक्षाबंधन उपक्रम - पद्मावती, पुणे दिनांक : 9 ऑगस्ट 2025**




**रक्षाबंधन निमित्त पद्मावती, पुणे येथे झालेल्या कौटुंबिक कार्यक्रमात इंडियन नॅचरल हनीबिज, पुणे तर्फे विशेष शैक्षणिक उपक्रम घेण्यात आला.**

**या उपक्रमात मुलांना साप, मधमाश्या आणि फुलपाखरे यांची माहिती देण्यात आली. माहितीफलकांद्वारे (Information Boards) ज्ञान मिळाले तसेच प्रश्नोत्तर सत्र घेण्यात आले. या उपक्रमाला मुलांसह पालक मिळून एकूण ३५ जण उपस्थित होते.**

**मुलांनी नवीन माहिती मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. पालकांनीही "हा उपक्रम ज्ञानवर्धक व उपयुक्त ठरला" असे सांगून कौतुक केले.कार्यक्रमात Save the Honeybees ची शपथ सर्वांनी घेतली.कार्यक्रमाचे छायाचित्रण व व्हिडिओ चित्रण करून आठवणी जपल्या गेल्या.**

**हा उपक्रम छोट्या चॅम्प्ससाठी शैक्षणिक, सर्जनशील आणि आनंददायी ठरला.**



Wildlife व पर्यावरण ड्रॉइंग स्पर्धा दिनांक : 10 ऑगस्ट 2025

ठिकाण : वडगाव मावळ

सहभागी : सुमारे 1000 विद्यार्थी




कार्यक्रमाचे विवरण :

- वन्यजीव रक्षक संस्था यांनी Wildlife व पर्यावरण या विषयावर ड्रॉइंग स्पर्धा आयोजित केली.
- श्री. संजय मारणे, संचालक, Indian Natural Honeybees, पुणे यांना Honeybees विषयक उत्कृष्ट कामासाठी Trophy देऊन सन्मानित केले गेले. हा पुरस्कार श्री. नीलमकुमार खैरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सुमारे 1000 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व उत्साहपूर्ण प्रदर्शन केले.

विद्यार्थ्यांना 1, 2, 3 क्रमांक तसेच उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले.

- इतर संस्था व सहभागी व्यक्तींनी देखील त्यांच्या हस्ते विद्यार्थी व कार्यकर्त्यांचे सन्मान केले.
- या कार्यक्रमाचे योजना व व्यवस्थापन श्री. निलेश गराडे व त्यांच्या टीमने उत्कृष्टपणे केले.

हा उपक्रम अत्यंत सुंदर, प्रेरणादायी व यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण व मधमाशी संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली व सहभागी सर्वांनी उत्साहाने कार्यक्रमाचा आनंद घेतला.

- “Honeybee Education & Awareness Model” – मुलांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी सुलभ पद्धतीने तयार केलेले चार्ट, व्हिडिओ, प्रत्यक्ष दाखले
    - “Beekeeping for All” ही मोहीम - नवशिक्यांसाठी मोफत मार्गदर्शन
    - गावोगाव डेमो क्रिया : राणी मधमाशी ओळख, फ्रेम निरीक्षण, मध काढणी
- Honeybee Exhibition – मधपेट्या, उपकरणे, परागीभवन मॉडेल्स सादर करणे
    - “Selfie with Honeybees” उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आकर्षण निर्माण
    - नैसर्गिक मधमाशांवरील मराठी माहिती पुस्तिका, कॅलेंडर, पोस्टर्स प्रकाशन
    - परागीभवनाचे फायदे सांगणाऱ्या फुलझाड लागवडीच्या मोहीमा

३. आपल्या माध्यमातून कोणकोणाचा परिसरात? किती व्यक्तींना? कशा प्रकारे फायदा झाला? त्याबद्दल माहिती




Honeybees Save Campaign – 2023 ते 2025 यशोगाथा

1. प्रारंभ - जनजागृती मोहिम (2020)

- Save Honeybees अभियानांतर्गत 200 बॅनर्स तयार करून पुण्यातील
- Society’s Clubs

- गणपती मंडळांचे स्टॉल • मंदिरे
- Ladies Clubs




येथे लावण्यात आले.

- मुख्य संदेश :
  - मधमाश्या मारू नका 🚫
  - मधमाश्या जाळू नका 🚫
  - Pest Control करू नका 🚫

सुरक्षित Organic पद्धतीने (सेंद्रिय पद्धत) मधमाश्या काढा ✅




-

2. प्रत्यक्ष कार्य व कौशल्य विकास

- बॅनर्समुळे समाजातून व संस्थांकडून कॉल्स येऊ लागले.
- दोन व्यक्तींचे सहकार्य मिळाले → त्यांच्या सोबत जाऊन प्रत्यक्ष “How to Remove Safely” शिकले.
- पुण्यातून सुरुवात होऊन काम Fire Brigade, Corporation, Schools, Colleges, Societies, Tata Power, Ajanta Caves Forest Department, Industries या सर्व ठिकाणी पोहोचले.

3. यशस्वीरीत्या पूर्ण केलेले काम

- एकूण 550+ Dorsata व Floria Honeybees Hives सुरक्षितरीत्या काढून निसर्गात सोडण्यात आले.
- Cerena Indica मधमाश्या → Bee Boxes मध्ये Capture करून पालनासाठी ठेवण्यात आल्या.
- विशेष कार्य : Tata Power – Bhivpuri Dam Campus





- 28 Live Hives + 6 Dead Hives = 34 Hives एका दिवसात काढले
- Honey Concerned Staff व Officers यांना सुपूर्द केले → त्यांनी खूप समाधान व्यक्त केले.

4. रोजगार निर्मिती

- कामासाठी घेतलेल्या शुल्कातून दोन व्यक्तींना स्थिर रोजगार उपलब्ध झाला.

5. महाराष्ट्रातील विस्तार - Snake Friends सोबत (2020–2025)

- Snake Friends Groups सोबत संवाद साधला.
- त्यांना सांगितले की जसे ते साप वाचवतात, तसेच मधमाश्याही वाचवता येऊ शकतात.
- 50 Snake Friends ची Zoom Meeting घेऊन
- Videos, Pictures व Training द्वारे "How to Remove & Save Bees" शिकवले.
- ते तयार झाले व महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात Honeybees Save उपक्रम राबवायचे ठरले.

6. जिल्हानिहाय उपक्रमाची सुरुवात

- शिर्डी (अहमदनगर), धुळे, जळगाव, नागपूर, बुलढाणा, ठाणे, पुणे, नाशिक



मधमाशी संवर्धन व सुरक्षित स्थलांतर कार्यवाही

शिरपूर - येथे दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी सर्वज्ञ नगर, शिरपूर येथील प्लॉट नं. ३०, श्री. डॉ. अतुल जैन सर यांच्या इमारतीवर गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात मधमाशांचे पोळे निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि पर्यावरण रक्षणाच्या उद्देशाने, या मधमाशांचे पोळे सुरक्षितपणे स्थलांतरित करण्यात आले.या कार्यासाठी वाघाडी येथील जीवरक्षा वन्यजीव संरक्षण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व सर्पमित्र श्री. दिनेशभाई बोरसे, त्यांचे सहकारी सर्पमित्र श्री. राज वाघ, तसेच पुणे येथील इंडियन नॅचरल हनीबीज संस्थेच्या संयुक्त विद्यमानाने आणि संजय मारणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वीरित्या पार पडली. (पान ३ वर)

- या 8 जिल्ह्यांमध्ये Snake Friends ने Honeybee Hives Organic पद्धतीने काढणे सुरू केले.

7. माध्यमांचे लक्ष

- Save Honeybee उपक्रम यशस्वीपणे सुरू झाल्याबद्दल
- सकाळ वृत्तपत्र (छत्रपती संभाजीनगर आवृत्ती) यांनी सविस्तर बातमी प्रसिद्ध केली.

8. गौरव व सन्मान

- 20th May 2025 – World Honeybee Day
- KVIC Mumbai येथे "Indian Natural Honeybees Pune" तर्फे

- 15 Snake Friends यांना Honeybees Save Puraskar प्रदान करण्यात आला.
- या वेळी CBRTI चे Director – Mrs. Uikey उपस्थित होत्या.

9. सामाजिक परिणाम

- अंदाजे 780 Snake Friends या उपक्रमात सहभागी झाले.
- यासाठी Google Form तयार करण्यात आला → Indian Natural Honeybees Pune च्या मार्गदर्शनानुसार नोंदणी केली गेली.
- या सगळ्या कार्यासाठी Hat's Off to All Snake Friends! 🎉

🌿 एकूण परिणाम

1. मधमाश्यांचे संवर्धन - 1000 + हायव्हज सुरक्षित निसर्गात सोडले.
2. जागरूकता वाढली - समाजात व संस्थांमध्ये "Honeybees Save" चळवळ रुजली.
3. रोजगार निर्मिती - तरुणांना कामाची संधी.
4. संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार - Snake Friends च्या माध्यमातून 8 जिल्ह्यांत उपक्रम सुरू.
5. माध्यमांतून प्रसिद्धी - वृत्तपत्रांमुळे उपक्रमाला लोकमान्यता मिळाली.

- पुणे, नाशिक, अहमदनगर, सातारा, सोलापूर, विदर्भ या भागातील ३०००+ शेतकरी व विद्यार्थी यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन.
- महिलांसाठी Self Help Groups मध्ये मधमाशी पालन प्रशिक्षण दिल्याने अतिरिक्त उत्पन्नाचे साधन निर्माण.

- 50+ शेतकऱ्यांनी मधमाशी पालन सुरू केले.
- विविध फळबागांमध्ये (डाळिंब, पेरू, नारळ, पपई) परागीभवनामुळे उत्पादनात २५-४०% वाढ.
- विद्यार्थ्यांसाठी ५०+ शाळांमध्ये मधमाशांचे पर्यावरणातील योगदान याबाबत उपक्रम.

- National Bee Board (NBB) – तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षणात सहभाग.

**National Seminar on Scientific Honey Beekeeping**
**Hyderabad | 15–16 February 2024**




मी हैदराबाद येथे आयोजित National Seminar on Scientific Honey Beekeeping मध्ये सहभागी झालो. या कार्यक्रमात डॉ. श्रीकांत शर्मा व श्री. शिरीष कुलकर्णी (NI-MSME, Hyderabad) उपस्थित होते.

मी मधमाश्यांवरील मराठीतील प्रतीज्ञा (Oath) त्यांना दाखवली. त्यांच्या सूचनेनुसार ती इंग्रजी व हिंदीत रूपांतर करून दिली. त्यावर आधारित त्यांनी मधमाशी जागरूकता कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी सुमारे ५०० लोकांकडून शपथ घेतली. हा उपक्रम इतर राज्यातही पार पडल्याने मला अभिमान वाटला.

या परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे :

- Honeybee Protection & Conservation
- Awareness Programs आयोजित करण्याची पद्धत
- मध उत्पादनाचे Marketing व Sales Techniques
- Products व Projects Management

या ज्ञानामुळे माझा मधमाशीपालनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला.

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

निम्समे
ni-msme

राष्ट्रीय सूक्ष्म, लघु और मध्यम उद्यम संस्थान (निम्समे)
National Institute for Micro, Small and Medium Enterprises
(ni-msme)

An Organisation of the Ministry of MSME, Govt. of India
(An ISO 9001:2015 Certified Organisation)
Yousufguda,
Hyderabad 500 045
(India)

Phones
+91-40-23633499
+91-40-23608544
+91-40-23608546
+91-40-23608317

Fax
+91-40-23608547
+91-40-23608956

Email
webmaster@nimsme.org

Website
www.nimsme.org


ni-msme/NBHM/2025-26 Date: 05.12.2025

To
Mr. Sanjay Marne
Asst. Forest Officer (Retd.)
Pune

Subject: Appreciation for Your Valuable Contribution to the National Seminar on Scientific Honey Beekeeping organized at Agri Vision 2025, Nagpur.

Dear Sir,

Greetings from National Institute for MSME (**ni-msme**) Hyderabad !!

On behalf of ni-msme, Hyderabad, and the organizing committee of the National Seminar on Scientific Honey Beekeeping Integrated with National Oilseeds Mission held on 21–22 November 2025, we extend our heartfelt appreciation for your insightful and engaging presentation.

Your session on "Importance of Honey Bees in India's Food Security" was one of the key highlights of Day 1. The depth of knowledge you shared, backed by scientific understanding and practical field experience, enriched the seminar and broadened the perspectives of all participants. Your articulate explanation of the integral role of honey bees in pollination, honey bee calendar, crop productivity, biodiversity, and national food security was highly impactful and well received by delegates from various sectors.

Your contribution significantly added value to the seminar's objective of promoting scientific beekeeping practices aligned with the goals of increasing oilseeds production. We sincerely appreciate your time, effort, and commitment towards strengthening India's beekeeping and agricultural ecosystem.

We look forward to continued collaboration in future programmes and initiatives.

Thank you once again for your distinguished contribution.

Yours faithfully

Shreekant Sharma

Dr. Shreekant Sharma
Director, SEE

- KVIC – मधपेट्या व उपकरणांवरील माहिती, शासकीय योजनांचे मार्गदर्शन.

मधमाशीपालन प्रशिक्षणाचा अहवाल

📅 दिनांक : 3 सप्टेंबर 2024

ठिकाण : वंचित संस्था, लोहगाव, पुणे



वंचित संस्थेतर्फे मधमाशीपालन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण 25 सहभागी उपस्थित होते.

कार्यक्रमास KVIC चे निरीक्षक श्री. शंकर खांडेरे तसेच इंडियन नॅचरल हनीबिज, पुणेचे संचालक श्री. संजय मारणे मार्गदर्शनासाठी उपस्थित होते.

👉 श्री. खांडेरे यांनी KVICच्या योजना व सहाय्याबाबत माहिती दिली.
👉 श्री. मारणे यांनी मधमाश्यांबाबत सविस्तर माहिती, प्रत्यक्ष ज्ञान व प्रॅक्टिकल डेमोन्स्ट्रेशन दिले.
👉 सहभागींसोबत प्रश्नोत्तरांद्वारे संवाद साधण्यात आला.

सहभागींनी व्यक्त केले की या प्रशिक्षणातून त्यांना उत्कृष्ट माहिती, प्रॅक्टिकल हाताळणीचा अनुभव आणि समाधान मिळाले. त्यामुळे प्रशिक्षण अत्यंत यशस्वी व उपयुक्त ठरले.

🌿 🐝 मधमाशीपालन - शेतीपूरक व पर्यावरणपूरक व्यवसाय 🌿 🐝

- राज्य कृषि विभाग - कृषी मेळावे व जनजागृती कार्यक्रमात व्याख्यानासाठी आमंत्रित.

मधमाशी प्रशिक्षण कार्यक्रम -

दिनांक : 6 फेब्रुवारी 2024

🏢 ठिकाण : कृषी सह-संचालक कार्यालय, पुणे (ATMA Office)




👥 सहभागी : CBO चे संचालक व कार्यालयीन कर्मचारी - एकूण 25 सहभागी

कार्यक्रम कृषी सह-संचालक कार्यालय, पुणे येथे Beekeeping Training Program आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात -

- 🐝 मधमाशींचे प्रकार, जीवनचक्र, व पर्यावरणातील महत्त्व याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.
- 🌾 मधमाश्यांचे कृषी व पिकांच्या परागीभवनातील महत्त्व स्पष्ट करून शेतकऱ्यांसाठी त्यांचे फायदे सांगण्यात आले.
- 🛠️ Beekeeping संदर्भातील तांत्रिक माहिती व उपकरणांची माहिती देण्यात आली.
- 🧑‍💼 सहभागींसोबत थेट Interaction व Questions–Answers Session घेण्यात आला.
- 🧑‍🌾 सहभागी सदस्यांनी मत व्यक्त केले की - "ही माहिती शेती व पिकांच्या उत्पादनवाढीसाठी अत्यंत उपयुक्त आहे."

विशेष उपस्थिती :या कार्यक्रमाला मा. श्री. विजय हिरेमठ, सह-संचालक कृषी, पुणे उपस्थित राहिले. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करून भविष्यात अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे नमूद केले.

# राष्ट्रीय निवासी प्रशिक्षण शिबिर -

**दिनांक : 29 फेब्रुवारी ते 2 मार्च 2024**

**ठिकाण : वाडेबोळाई, पुणे**

**सहभागी : देशभरातील 195 शेतकरी**




**कार्यक्रमाचे विवरण :**

वाडेबोळाई, पुणे येथे तीन दिवसांचे राष्ट्रीय स्तरावरील निवासी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात -

- 🌱 पद्मश्री डॉ. सुभाष पालेकर यांनी 195 शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती कशी करावी याचे मॉडेल-निहाय मार्गदर्शन केले.
- 📖 डॉ. पालेकर यांना "मधमाशी संरक्षण व संवर्धन" हे पुस्तक भेट देण्यात आले.
- 🐝 सर्व सहभागी शेतकऱ्यांना मधमाश्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.
- 🌾 सेंद्रिय शेतीमध्ये मधमाश्यांचे परागीभवनातील कार्य कसे महत्त्वाचे आहे व त्यामुळे पिकांचे उत्पादन कसे वाढते हे स्पष्ट करण्यात आले.
- 🧑‍🌾 शेतकऱ्यांनी Interaction व Questions–Answers Session मधून शंका

विचारल्या. त्यांनी ही माहिती अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले.

· 📚 Honeybee Protection & Conservation विषयक पुस्तके विक्रीसाठी ठेवण्यात आली असून शेतकऱ्यांनी ती मोठ्या उत्साहाने विकत घेतली.

विशेष नोंद :

- या कार्यक्रमाला खूप चांगला प्रतिसाद मिळाला.
- शेतकऱ्यांच्या मते हा अनुभव स्मरणीय व ज्ञानवर्धक ठरला.

· 🌟 डॉ. सुभाष पालेकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करून भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## सेंद्रिय शेती व मधमाशी जनजागृती कार्यक्रम -

दिनांक : 3 मार्च 2024

ठिकाण : साई हायटेक नर्सरी, सिंगापूर, सासवड, पुणे

सहभागी : 105 शेतकरी



🌱 पद्मश्री डॉ. सुभाष पालेकर यांनी 105 शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती कशी करावी याचे मॉडेल

निहाय मार्गदर्शन केले.

· 🌿 नर्सरीचे मालक श्री. संजय कोर्डे यांनी जीवामृत व घनजीवामृतचा वापर व त्याचे फायदे याबाबत सविस्तर माहिती दिली.

· 🌳 सर्व शेतकऱ्यांना रोपवाटिकेची पाहणी करून दिली तसेच आंब्याच्या झाडावर कलम कसे करतात याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

· 🐝 श्री. संजय मारणे, संचालक, Indian Natural Honeybees, पुणे यांच्यातर्फे मधमाश्यांची सविस्तर माहिती देण्यात आली.

- मधमाश्यांच्या परागीभवनामुळे पिकांचे उत्पादन 35 ते 40% पर्यंत वाढते हे स्पष्ट करण्यात आले.
- 🧑‍🌾 शेतकऱ्यांबरोबर Interaction व Questions–Answers Session घेण्यात आला.
- 🌱 शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाचे कौतुक करत नर्सरीतील रोपे खरेदी केली.

**निष्कर्ष :**

हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रात्यक्षिक व अत्यंत उपयुक्त ठरला. सेंद्रिय शेतीबरोबरच मधमाशी संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित झाले व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून प्रेरणा मिळाली.

## World Honeybee Day 2024

**ठिकाण:** Kundal Prabodhini

**दिनांक:** 20 मे 2024



TODAY सांगली, शुक्रवार, २४ मे २०२४ सकाळ

# कुंडलला वन प्रबोधिनीत मधमाशी दिन

कुंडल, ता. २३ : मधमाश्या पर्यावरणीय समतोल व जैवविविधता संवर्धनासाठी उपयुक्त असल्याचे प्रतिपादन निवृत्त सहायक वनसंरक्षक संजय मारणे यांनी केले. कुंडल वन प्रबोधिनीत जागतिक मधमाशी दिन साजरा करण्यात आला. निवृत्त सहायक वनसंरक्षक रामदास पुजारी, वनक्षेत्रपाल गायत्री वसावे प्रमुख उपस्थित होते.

मारणे म्हणाले, "मधमाश्या परागीभवनात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असून, फुले येणाऱ्या वनस्पतींत व पिकांमध्ये परागसिंचनाच्या त्यांच्या कार्यामुळे चांगल्या दर्जाची व भरपूर बीजनिर्मिती होते. विविध प्रकारची फुले, फळे, अन्नधान्याची निर्मिती होऊन अन्नविषयक गरजा भागतात. मधमाश्या पर्यावरणीय समतोल व जैवविविधता संवर्धनासाठी तसेच कृषी पिकांसाठी, मानवी आरोग्य व औषधांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत."

बी एंगेज्ड विथ युथ (Bee engaged with youth) ही २०२४ या वर्षीच्या मधमाशी दिनाची संकल्पना आहे. रामदास पुजारी यांनी जागतिक मधमाशी दिन साजरा करण्यामागची पार्श्वभूमी विशद केली. हा दिवस २० मे २०१८ पासून जगभर साजरा केला जातो. वनक्षेत्रपाल गायत्री वसावे यांनीही विचार व्यक्त केले. मारणे यांनी मधमाश्यांचे प्रकार, त्यांचे महत्त्व, वैशिष्ट्ये, मधमाश्या वाचविण्याची गरज, मधुमक्षिका पालन आदी विषयांना स्पर्श करत मधमाश्यांविषयी इत्यंभूत माहिती दिली.

मारणे यांचे 'मधमाशी संरक्षण व संवर्धन' हे पुस्तक महाराष्ट्र वन विभाग (पुणे) कडून प्रकाशित करण्यात आले आहे. पृथ्वीवरील मधमाश्यांचा नाश झाला, तर काही वर्षांतच पृथ्वीवरील मानवजातीचा अंत होईल, अशा प्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा. अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या नोंदीचीही मारणे यांनी आठवण दिली.

रामदास पुजारी यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. प्रबोधिनी, प्रशिक्षण घेत असलेले महाराष्ट्र राज्यातील ४२ परिविक्षाधीन वन परिक्षेत्र अधिकारी, गडचिरोली, चंद्रपूर व धुळे वनवृत्तांतील १०८ वनरक्षक प्रशिक्षणार्थी तसेच प्रबोधिनीतील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

कुंडल : वन प्रबोधिनी येथे जागतिक मधमाशी दिन साजरा करण्यात आला.

**उद्दिष्ट:** मधमाशांचे संवर्धन आणि जागरूकता कार्यक्रम

**उपस्थिती:**

- एकूण 108 सहभागी (गार्ड, फॉरेस्टर, RFO कर्मचारी आणि अधिकारी)
- प्रमुख पाहुणे: श्री संजय मारणे, Director, Indian Natural Honeybees, Pune
- इतर पाहुणे: रामदास पुजारी (Retired ACF), गायत्री वसावे (RFO)

**कार्यवाही:**

- श्री संजय मारणे यांनी मधमाशांबाबत सविस्तर माहिती दिली.
- सहभागींच्या संकल्पात "Save Honeybee" ची शपथ घेण्यात आली.
- युवा संघटना (Youth Hi Sankalpana Mandali) मधमाशांच्या संवर्धनासाठी सक्रिय सहभागी झाली.

थोडक्यात:

कार्यक्रमाचा उद्देश मधमाशांबाबत जनजागृती करणे, संबंधित अधिकारी आणि युवा वर्गामध्ये संवेदनशीलता निर्माण करणे हा होता.

## एक दिवशीय मधमाशीपालन कार्यशाळा - संक्षिप्त अहवाल

स्थळ : कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी, वने कुंडल, जि. सांगली

- दिनांक : ७ जून २०२४



- आयोजन : केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांची मंजुरीनुसार
- उपस्थित अधिकारी : श्री. पुरी व श्री. राहुल काळे (कार्यकारी अधिकारी)
- कार्यक्रमाची वैशिष्ट्ये :
- अधिकाऱ्यांनी मधमाशीपालनाविषयी मार्गदर्शन केले
- Indian Natural Honeybees, Pune तर्फे 108 वनरक्षकांना सविस्तर माहिती देण्यात आली

👉 कार्यशाळेत मधमाशीपालनाबाबत यशस्वी जनजागृती झाली.

या क्षेत्रात काम करताना आलेल्या अडचणी आणि त्यांचे निराकरण

अडचणी :

- मधमाशी डंखाची भीती
- कृषी रसायनांच्या वापरामुळे मधमाशी मृत्यू
- चुकीच्या माहितीमुळे लोक मधमाशी पालन टाळतात
- हवामानातील बदलामुळे मध उत्पादनात घट

निराकरण :

- Bee Suit देऊन सुरक्षितता दाखवून भीती कमी केली
- शेतकऱ्यांना "रसायन फवारणी वेळापत्रक" योग्य पद्धतीने समजावले
- मोफत शैक्षणिक व्हिडिओ, जागरूकता मोहीम
- फुलझाडे व नैसर्गिक चारासाठी environment-friendly उपाय सुचवले

## मधमाशी पालनास प्रोत्साहन देण्यासाठी आपली भावी योजना

- Honeybee Tourism / Honeybee Education Center सुरू करणे
- नवनवीन गावांमध्ये "Bee Friendly Village" संकल्पना राबवणे
- जिल्हास्तरीय Honeybee Awareness Workshops
- विद्यार्थ्यांसाठी वार्षिक "Honeybee Science Exhibition"
- ऑनलाइन प्रशिक्षण व सल्ला केंद्र
- महिलांसाठी "Home-Based Beekeeping" योजना
- परागीभवनावर आधारित फळबाग प्रकल्प

## मधमाशी पालन व्यवसायाबाबत एकूण प्रतिक्रिया व अनुभव


मधमाशी पालन हा पर्यावरण, शेतकरी आणि शेती उत्पादन वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा व्यवसाय आहे.

मधमाशांमुळे–

- शेती उत्पादन वाढते
- नैसर्गिक परिसंस्था संतुलित राहते
- ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते

या क्षेत्रात काम करताना मला समाजातील अनेकांना मदत, मार्गदर्शन आणि प्रेरणा देता आली. भारतीय मधमाशा व त्यांचे संवर्धन हा माझा जीवनातील एक प्रमुख ध्येय आहे.

🌿 **Indian Natural Honeybees, Pune या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आलेली प्रकाशने :**







1. 📖 **पुस्तक : “मधमाशी संरक्षण व संवर्धन”**

*** लेखक : संजय मारणे, सहाय्यक वनसंरक्षक, पुणे वनविभाग (सेवानिवृत्त)**

*** प्रकाशन : मा. ना. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार, मंत्री वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य**

*** दिनांक : २४ फेब्रुवारी २०२४, ठिकाण : चंद्रपूर**

* उपस्थिती : PCCF श्री. तेंभुर्णीकर, APCCF श्री. विश्वास शॉमिता, CCF श्री. N.R. प्रवीण, DCF व इतर वरिष्ठ अधिकारी, वनकर्मचारी व अंदाजे ५००-६०० मान्यवर

* विशेषत्व : वनविभागात आजपर्यंत कोणीही मधमाशांवर पुस्तक लिहिले नसल्याने हा एक अनोखा व अभिमानास्पद उपक्रम ठरला.

2. 🐝 माहितीपत्रक (Brochure) : "मधमाशी - प्रकार, वैशिष्ट्ये व खबरदारी"

* विषय : मधमाशांचे प्रकार, वैशिष्ट्ये, दंश झाल्यास घरगुती उपाय, पर्यटकांनी घ्यायची काळजी



* प्रकाशन : सौ. सुप्रिया सुळे (MLA, बारामती)

* दिनांक : २५ जानेवारी २०२४, ठिकाण : बारामती

* उपस्थिती : श्री. कोंधरे, उपसभापती, मुळशी व इतर मान्यवर

* विशेषत्व : सर्व उपस्थितांनी माहितीपत्रकाचे कौतुक व उपयुक्ततेची नोंद केली.



3. 📅 **टेबल कॅलेंडर २०२४ : “Honeybees माहिती विशेषांक”**

*** विषय : वर्षभरातील महत्त्वाच्या तारखांसोबत मधमाशांबाबत माहिती**

*** प्रकाशन : डॉ. नितीन करीर, मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई**

*** दिनांक : १६ जानेवारी २०२४, ठिकाण : मंत्रालय, मुंबई**

*** उपस्थिती : वरिष्ठ अधिकारी व मित्रपरिवार, maze mitra श्री. भागीरथ निमसे (Former ACF, अहिल्यानगर)**

*** विशेषत्व : उपस्थित सर्वांनी या उपक्रमाचे अभिनंदन व प्रशंसा केली.**




4.📅 टेबल कॅलेंडर २०२५ : "मधमाशांचे ऋतूनुसार कार्य"

* विषय : प्रत्येक महिन्यात मधमाशांचे विविध कार्य व जीवनचक्र

* प्रकाशन : सौ. उइके मॅडम, संचालक CBRTI, पुणे

* दिनांक : ९ जानेवारी २०२५, ठिकाण : CBRTI, पुणे (राज्यस्तरीय मधमाशीपालक मेळावा)

* उपस्थिती : पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, अधिकारी, कर्मचारी, मधमाशीपालक

* विशेषत्व : उपस्थितांनी ही कल्पना नवीन, उपयुक्त व प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

5. Agrovision या कार्यक्रमाचे आयोजन 21 ते 24 नोव्हेंबर 2025 रोजी नागपूर या कार्यक्रमात Scientific Beekeeping – National Bee Board, हैदराबाद यांच्यावतीने मधमाशीपालनावरील विशेष उपक्रम राबविण्यात आला.




दिनांक 21 नोव्हेंबर 2025 रोजी माननीय श्री नितीनजी गडकरी, दळणवळण आणि रस्ते विकास केंद्रीय मंत्री, यांच्या शुभहस्ते Honeybee विषयावर तयार केलेले Indian Natural Honeybees – 2026 हे कॅलेंडर प्रकाशित करण्यात आले.



प्रदर्शन ॲग्रोव्हिजनमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन

## कृषी आधारित पूरक व्यवसाय स्वीकारा

नागपूर, शहर प्रतिनिधी. केवळ शेतीवर अवलंबून राहिल्याने आर्थिक समृद्धी होणार नाही. उलट, जर शेतकऱ्यांनी शेतीवर आधारित पूरक व्यवसायांना त्यांच्या शेतीत समाविष्ट केले तर त्यांचे उत्पन्न आणि उत्पादकता वाढू शकते. आपल्या देशात विस्तीर्ण वनक्षेत्र आहे. जर हे कृषी-आधारित उद्योगांशी जोडले गेले तर शेतकरी आणि आदिवासी दोघेही आर्थिकदृष्ट्या मजबूत आणि समृद्ध होऊ शकतात, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. ते ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात 'राष्ट्रीय तेलबिया अभियानांतर्गत एकात्मिक वैज्ञानिक मधमाशीपालन' या विषयावरील कार्यशाळेला संबोधित करत होते. याप्रसंगी राष्ट्रीय मधमाशी मंडळाचे महासंचालक डॉ. आशुतोष मुरकुटे, मधमाशी तज्ज्ञ संजय मारणे, राष्ट्रीय एमएसएमई संस्थेचे डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ. श्रीकांत शर्मा आणि डॉ. सी.डी. मायी उपस्थित होते.

**मधमाशी संवर्धन हीच खरी 'अन्न सुरक्षा'**

मारणे यांनी सांगितले की, जगातील ७५% पिके मधमाशांच्या परागीकरणावर अवलंबून असतात. फळे, भाज्या आणि तेलबिया पिकांचे उत्पादन थेट मधमाशांवर अवलंबून असते. मधमाशांचे संवर्धन ही खरी 'अन्न सुरक्षा' आहे आणि त्यांनी मधमाशांना राज्याचे अधिकृत कीटक घोषित करण्याची मागणी केली. डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले की, भारताला खाद्यतेलाच्या तीव्र कमतरतेमुळे आयातीवर अवलंबून राहावे लागते. कधीकधी आयात केलेले पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक असतात. म्हणूनच, सरकारने 'मध क्रांती' द्वारे मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. हा एक कमी किमतीचा, फायदेशीर आणि जीवन बदलणारा व्यवसाय आहे. डॉ. कोल्हे यांनी सांगितले की जर मधमाशा गायब झाल्या तर पृथ्वीची अन्नसाखळी कोलमडेल आणि काही वर्षांत मानवी अस्तित्व धोक्यात येईल. मधमाशा पालन केवळ मधच नाही तर अन्न, औषध आणि सौंदर्यप्रसाधन उद्योगात वापरल्या जाणाऱ्या इतर अनेक मौल्यवान उत्पादनांचा पुरवठा करते. त्यांनी माहिती दिली की जगात मधमाश्यांच्या सुमारे २५,००० प्रजाती आहेत, त्यापैकी सुमारे ९०% एकट्या आहेत आणि परागकण गोळा करत नाहीत. फक्त १०% प्रजाती [illegible] आणि मध तयार करतात.

**सुरक्षा आणि व्यवस्थापन करणे महत्त्वाचे**

क्षीरसागर म्हणाले की, हवामान आणि वातावरणातील चढउतारांचा थेट मधमाशांच्या वसाहतींवर परिणाम होतो. म्हणूनच, योग्य व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यामध्ये पोळ्यांमध्ये योग्य तापमान राखणे, पुरेसे अन्न देणे आणि नियमित काळजी घ्यावी लागते.

कॅलेंडर विमोचन प्रसंगी श्री अशुतोष मुरकुटे,श्रीकांत शर्मा,तसेच शिरीष कुलकर्णी हे मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात स्पीकर म्हणून "Honeybees: Importance for Food Security in

Farming” या विषयावर मला मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. शेतीतील अन्नसुरक्षेसाठी मधमाश्यांचे परागीभवन, पिकांच्या उत्पादनवाढीतील त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका, पर्यावरणीय संतुलन आणि शाश्वत शेती पद्धती यांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

🐝 🐝 🐝

✨ याशिवाय, मधमाशांवरील आणखी एक पुस्तक लवकरच प्रकाशित होणार असून, हा प्रवास पुढेही सुरू राहील.

## मधमाशी संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम

1. CBRTI, पुणे

- 📅 3 ते 7 जून 2022
- Short Term Beekeeping (5 दिवसांचे प्रशिक्षण) पूर्ण केले.
- मधमाशी पालनाच्या वैज्ञानिक तंत्रज्ञानाची सखोल माहिती मिळाली.

2. CBRTI, पुणे

- 📅 17 फेब्रुवारी 2022
- One Day Honey Testing Training पूर्ण केले.
- मधाची गुणवत्ता तपासणी व त्यावरील मूलभूत शास्त्रीय माहिती मिळाली.

3. BAIF, वाघोली, मंझरी खुर्द

- 📅 4 मार्च 2022
- Stingless Honeybees Awareness Training Program आयोजित केला.
- या कार्यक्रमात 36 शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.
- शेतकऱ्यांना Bee Boxes व त्यांचा वापर याबाबत सविस्तर माहिती देण्याची संधी मिळाली.

4. CBRTI, पुणे



मधुमक्खी पालन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

शिवाजीनगर, 17 जून
(आज का आनंद न्यूज नेटवर्क)

शिवाजीनगर स्थित केंद्रीय मधुमक्खी अनुसंधान एवं प्रशिक्षण संस्थान, पुणे में पांच दिवसीय मधुमक्खी पालन प्रशिक्षण कार्यक्रम 10 से 14 जून तक आयोजित किया गया था. इसमें कुल 14 प्रशिक्षणार्थियों ने भी भाग लिया. इस प्रशिक्षण में प्रत्यक्ष मधुमक्खी के बॉक्स को हैंडलिंग और परिचालन का प्रशिक्षण भी दिया गया.

प्रैक्टिकल, लाइव कॉलोनी दिखाने के लिए सरविन सिंह तरार एवं आर. टी. आटपाडी, राहुल काले कार्यकारी इनका भी संस्थान की तरफ से सहयोग प्राप्त हुआ. मौजूदा प्रशिक्षण संचालित करने हेतु प्रशिक्षण टीम एवं सभी युवा पेशेवर ने भी अपना सहयोग दिया. पर्यावरण संतुलन में मधुमक्खी पालन का जो महत्व है उसे देखते हुए सभी प्रशिक्षणार्थी अपनी गर्मियों की छुट्टियों का समय मधुमक्खी पालन प्रशिक्षण में दे रहे हैं, ये बहुत सराहनीय है.

एवं इस बैच के एक प्रशिक्षणार्थी, संजय मारणे (रिटायर्ड) सहायक वन संरक्षक पुणे द्वारा लिखी गई 'चल[illegible] मधमाशी वाचवु या' का पर्या[illegible] संतुलन के लिए प्रतिज्ञा का [illegible] किया गया ताकि लोगों के म[illegible] मधुमक्खियों के प्रति प्रेमभाव बढ़े और सभी उनके छत्तों का रक्षण करते हुए पर्यावरण संरक्षण में अपना योगदान दें.

- 10 ते 14 जून 2024
- Short Term Beekeeping Refresh – 5 Days Training घेतले.
- या प्रशिक्षणामध्ये Honeybees वरील "Oath" घेण्याचा उपक्रम घेण्यात आला.
- हे सत्र श्री. संजय मारणे यांनी घेतले व श्री. राहुल काळे यांनी सहभागींकडून शपथ मांडून घेतली.
- या उपक्रमाची बातमी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाली.
- स्वतःसाठी हा अभिमानास्पद क्षण ठरला.

5. CBRTI, पुणे

- 📅 7 जुलै 2025
- Local Skilled Trainer (LSK) Meeting आयोजित झाली.
- श्रीमती उइके मॅडम, अधिकारी व इतर बीकीपर्स उपस्थित होते.
- "Beekeepers Training" कसे घ्यायचे, किती सहभागींवर कोणते विषय घ्यायचे याबाबत चर्चा झाली.
- विषयवार Profile तयार करण्याचे ठरले.
- या बैठकीत श्री. संजय मारणे (Director, Indian Natural Honeybees, Pune) यांची Master Trainer म्हणून निवड झाली.
- CBRTI तर्फे 23 जुलै 2025 रोजी अधिकृत पत्र देण्यात आले.
- इतर बीकीपर्सची देखील निवड झाली.
- हा क्षण अत्यंत आनंददायी व गौरवास्पद ठरला.

बसवंत मधुकांती २०२५ पुरस्कार







“ बसवंत मधुकांती २०२५ पुरस्कार ” या मानाच्या कार्यक्रमासाठी Indian Natural Honeybees यांची निवड केल्याबद्दल मी आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानतो.

Indian Natural Honeybees ही संस्था मधमाशी संवर्धन, परागीकरण आणि पर्यावरण संरक्षण या क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. आम्ही शुद्ध नैसर्गिक मधासह Beeswax, Propolis, Royal Jelly, Bee Pollen यांसारखी मधमाशी उत्पादने उपलब्ध करून देतो.

आमच्याकडून Honeybees Boxes व Colonies सुद्धा उपलब्ध करून दिल्या जातात. यामध्ये Apis cerana indica, Apis mellifera तसेच Stingless Honeybees यांचे बॉक्स व वसाहती शेतकरी, बागायतदार व निसर्गप्रेमींसाठी पुरविले जातात.

आमचा विशेष भर देशी व डंख न मारणाऱ्या Stingless Honeybees यांच्यावर आहे, ज्या माणसांसाठी सुरक्षित असून शेती, फळबागा व पर्यावरणासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून पर्यावरणाबद्दल जाणीव निर्माण व्हावी यासाठी मधमाश्यांवर आधारित Drawing, Essay Writing, Rangoli, Debate तसेच Selfie with Honeybees अशा विविध स्पर्धा आम्ही शाळा व महाविद्यालयांमध्ये आयोजित करतो. भविष्यातील पिढीसाठी जागरूकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे, हा आमचा ठाम विश्वास आहे.

तसेच संस्थेमार्फत मधमाशी पालन व परागीकरण प्रशिक्षण, शेतकरी, महिला व युवकांसाठी कार्यशाळा तसेच मधमाश्यांची पोळी जाळणे किंवा मारणे न करता सुरक्षितपणे पुनर्वसन करण्याची सेवा संपूर्ण महाराष्ट्रभर दिली जाते.

भविष्यात पुणे शहरात तसेच ग्रामीण भागात “Honeybee Park” उभारण्याचा आमचा उद्देश आहे, जिथे विद्यार्थी, शेतकरी व नागरिकांना मधमाश्यांचे जीवन, परागीकरणाचे महत्त्व आणि निसर्गसंवर्धन प्रत्यक्ष अनुभवातून शिकता येईल.







**मधमाश्या वाचल्या तर शेती वाचेल, आणि शेती वाचली तर पर्यावरण टिकेल. या प्रतिष्ठित मंचावर आमच्या कार्याची दखल घेतल्याबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद.**













**इंडियन नॅशनल हनी बीज पुणे यांचे मार्फत मधमाशी शब्दकोश डिक्शनरी या पुस्तिकेचे बसवंत हनी पिंपळगाव येथे प्रकाशन झाले.**





**डॉक्टर नीलम कुमार खैरे, Snake तज्ञ यांनी Stingless मधमाशीची न्यू मॉडेल मतपेटी त्यांचे फार्म हाऊसला कारला येथे पर्यावरणाच्या दृष्टीने नागरिकांसाठी घेऊन गेले.**





**स्टिंगलेस मधमाशी पेट्यांचा पुरवठा**






**स्टिंगलेस मधमाशी पेट्यांचा पुरवठा**




**सामाजिक वनीकरण विभाग पुणे व पश्चिम विभागीय क्षेत्रीय सहस सुविधा केंद्र वनस्पतीशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांनी दिनांक 18 मार्च 2026 रोजी शेतकऱ्यांसाठी आयोजित केलेल्या मेळाव्यामध्ये मधुमक्षिका पालन या विषयावर इंडियन नॅचरल हनीबीज पुणे संचालक श्री संजय मारणे यांनी मधमाशांचे प्रकार मधमाशीपालन व उत्पादने यावर विस्तृत माहिती दिली**










**Melifera / Cerena Indica मधमाशी पेट्यांचा पुरवठा**

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, पुणे मधपालन प्रशिक्षण कार्यक्रम**




**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, पुणे यांच्या वतीने शिवाजीनगर, पुणे येथे मधपालन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात मधमाश्यांच्या पालनासोबतच स्टिंगलेस हनीबीज (डंख नसलेल्या मधमाश्या) याबाबत ट्रेनींना सविस्तर माहिती देण्यात आली.**

**या प्रशिक्षणात Indian Natural Honeybees, Pune चे संस्थापक श्री. संजय मारणे यांनी अत्यंत सखोल व मार्गदर्शक प्रशिक्षण दिले. त्यांनी स्टिंगलेस मधमाश्यांचे पालन, व्यवस्थापन, उत्पादन प्रक्रिया आणि त्याचे व्यावसायिक फायदे याबाबत तपशीलवार मार्गदर्शन केले.**

**या प्रसंगी KVIC चे अधिकारी श्री. शंकर खंदारे (निरीक्षक), उपस्थित होते. त्यांनी मधपालन व्यवसायाचे महत्त्व, ग्रामीण रोजगारनिर्मितीतील योगदान आणि शेतकऱ्यांसाठी उपलब्ध संधी याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.** 🐝 🐝 🐝

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, पुणे यांच्या मधपालन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत शिवाजीनगर, पुणे येथील प्रशिक्षणानंतर सहकारनगर, पुणे येथे श्री. नितीन पाटील (मित्रवर्य व बीकीपर) यांच्या फार्मवर प्रात्यक्षिक सत्र आयोजित करण्यात आले.**

**या प्रात्यक्षिक प्रशिक्षणामध्ये ट्रेनींना मधमाश्यांचे हाताळणी** (Handling), **बी हायव्ह** (Bee Hive) **साफसफाई, ब्रूड** (Brood) **व हनीबी चेंबर** (Honeybee Chamber) **याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.** Indian Natural Honeybees, Pune **चे संस्थापक श्री. संजय मारणे यांनी प्रत्यक्ष दाखवून सखोल प्रशिक्षण दिले.**

**या प्रसंगी** KVIC **चे अधिकारी श्री. खंदारे (निरीक्षक), श्री. पाटील तसेच देशमुख विश्वास उपस्थित होते. श्री. खंदारे (निरीक्षक) यांनीही बी बॉक्स हाताळणी व मध काढण्याचे प्रात्यक्षिक दाखवून ट्रेनींना मार्गदर्शन केले.**







जळगाव शहर

## शेतीमध्ये उत्पन्न वाढीसाठी मधमाश्यांचे महत्त्व - संजय मारणे

**मधमाशी पालन विषयावर जनजागृती ; ४० जणांचा सहभाग**

तभा वृत्तसेवा
जळगाव, १५ फेब्रुवारी

शेतीमध्ये परागीभवनासाठी मधमाश्यांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करण्यात आले. फळबाग, भाजीपाला व तेलबिया पिकांमध्ये उत्पादन वाढीसाठी मधमाश्या अत्यंत उपयुक्त ठरतात, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते, असे पुणे येथील संचालक, इंडियन नॅचरल हनीबीजचे संजय मारणे यांनी मधमाश्यांचे विविध प्रकार, त्यांचे उत्पादने, बी व्हेनम, परागीभवनाचे महत्त्व तसेच शेतीसाठी मधमाशी पालन कसे उपयुक्त आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

गांधी रिसर्च फाउंडेशन आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधमाशी पालन जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात एकूण ४० सहभागी उपस्थित होते.

जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, सहव्यवस्थापकिय संचालक अजित जैन यांच्या मार्गदर्शना खाली हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी यवतमाळ कृषी महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रदीप वादाफळे, अमरावती चे दिगंबर भुयार, नाशिक चे विजय चोंडेकर, सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक पी. टी. पाटील, जामनेरचे प्रगतीशील शेतकरी एस आर पाटील, जैन इरिगेशन कृषी विभागाचे संजय सोनजे, एनर्जी पार्क सीएसओ दिपक चौधरी, गांधी रिसर्च फाऊंडेशन सुधीर पाटील, लक्ष्मण देशमुख, जैन इरिगेशन वन वन्यजीव पर्यावरण विभागाचे सल्लागाराचे राजेंद्र राणे उपस्थित होते. मधमाश्यांचे प्रमुख प्रकार जसे की एपिस सेरेना इंडिका, एपिस मेलिफेरा, एपिस डॉर्साटा, एपिस फ्लोरिया तसेच डंखरहित मधमाश्या यांची माहिती देण्यात आली.

एपिस डॉर्साटा या मोठ्या आकाराच्या मधमाश्या असून त्या उंच झाडे व इमारतींवर उघड्यावर पोळे बांधतात. त्यांचे मध उत्पादन जास्त असते, परंतु त्यांचे नियंत्रित व्यवस्थापन करणे कठीण असते. एपिस फ्लोरिया या लहान आकाराच्या मधमाश्या असून त्या झुडपांवर किंवा लहान फांद्यांवर पोळे बांधतात. त्यांचे मध उत्पादन कमी असले तरी परागीभवनात त्यांचा महत्वाचा वाटा असतो. तसेच मधमाश्यांपासून मिळणारी उपउत्पादने जसे की मध, मेण, परागकण, रॉयल जेली, प्रोपोलिस आणि बी व्हेनम यांचे औषधी व आर्थिक महत्त्व स्पष्ट करण्यात आले. शेतीमध्ये परागीभवनासाठी मधमाश्यांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करण्यात आले. फळबाग, भाजीपाला व तेलबिया पिकांमध्ये उत्पादन वाढीसाठी मधमाश्या अत्यंत उपयुक्त ठरतात, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. ही संकल्पना स्पष्ट करत पर्यावरण संतुलनात मधमाश्यांची भूमिका विशद करण्यात आली. मधमाशी पालनाची देखभाल, बॉक्स व्यवस्थापन, राणी मधमाशीचे महत्व, रोग नियंत्रण, हंगामी काळजी आणि शेतीपूरक व्यवसाय म्हणून मधमाशी पालन कसे फायदेशीर ठरते यावर सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व ४० सहभागींकडून मधमाशी संरक्षणाची शपथ घेण्यात आली.

उपस्थितांनी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार राजेंद्र राणे यांनी मानले.



गांधी रिसर्च फाउण्डेशन
• सत्य • अहिंसा • शांती
जैन इरिगेशन सिस्टम्स् लि.
छोटे छोटे कदम, आसमाँ छुनेका दम.

जनजागृती कार्यक्रम

**प्रशस्तिपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, **श्री संजय मारणे,** संचालक -इंडियन नॅचरल हनी बीज, पुणे यांनी गांधी रिसर्च फाउण्डेशन आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधुमक्षिका पालनाविषयी कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ या वर्षात दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित कार्यशाळेत जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., च्या सहकाऱ्यांना मधुमक्षिका पालनाविषयी माहिती व मार्गदर्शन करून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या पर्यावरणप्रेमी कार्यातून समाजात सकारात्मक प्रेरणा रुजविले. त्यांच्या या कार्याची दखल घेत आम्ही हे प्रशस्तिपत्र त्यांना सन्मानपूर्वक प्रदान करीत आहोत.

| उदय महाजन | अजय काळे | राजेंद्र राणे |
|---|---|---|
| समन्वयक, | उद्यान / फलोद्यान विभाग | वन / वन्यजीव व पर्यावरण विभाग |
| गांधी रिसर्च फाउण्डेशन | जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., | जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., |

**मधमाशी पालन विषयावर जनजागृती कार्यक्रम 11 फेब्रुवारी 2026 उत्साहात संपन्न**

**पुणे : गांधी रिसर्च फाउंडेशन आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. यांच्या संयुक्त विद्‌यमाने आयोजित मधमाशी पालन जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात एकूण ४० सहभागी उपस्थित होते.**

**कार्यक्रमात श्री. संजय मारणे (संचालक - इंडियन नॅचरल हनीबीज, पुणे) यांनी मधमाश्यांचे विविध प्रकार, त्यांचे उत्पादने (By-products), बी व्हेनम (Bee Venom), परागीभवनाचे महत्त्व तसेच शेतीसाठी मधमाशी पालन कसे उपयुक्त आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.**

**मधमाश्यांचे प्रमुख प्रकार जसे की एपिस सेरेना इंडिका (Apis cerana indica), एपिस मेलिफेरा (Apis mellifera), एपिस डॉर्साटा (Apis dorsata), एपिस फ्लोरिया (Apis florea) तसेच डंखरहित मधमाश्या (Stingless Bees) यांची माहिती देण्यात**

आली.

- एपिस डॉर्साटा (Rock Bee) या मोठ्या आकाराच्या मधमाश्या असून त्या उंच झाडे व इमारतींवर उघड्यावर पोळे बांधतात. त्यांचे मध उत्पादन जास्त असते, परंतु त्यांचे नियंत्रित व्यवस्थापन करणे कठीण असते.
- एपिस फ्लोरिया (Little Bee) या लहान आकाराच्या मधमाश्या असून त्या झुडपांवर किंवा लहान फांद्यांवर पोळे बांधतात. त्यांचे मध उत्पादन कमी असले तरी परागीभवनात त्यांचा महत्त्वाचा वाटा असतो.

तसेच मधमाश्यांपासून मिळणारी उपउत्पादने जसे की मध, मेण (Beeswax), परागकण (Pollen), रॉयल जेली, प्रोपोलिस आणि बी व्हेनम (Bee Venom) यांचे औषधी व आर्थिक महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

शेतीमध्ये परागीभवनासाठी मधमाश्यांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करण्यात आले. फळबाग, भाजीपाला व तेलबिया पिकांमध्ये उत्पादन वाढीसाठी मधमाश्या अत्यंत उपयुक्त ठरतात, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. "No Bees – No Food" ही संकल्पना स्पष्ट करत पर्यावरण संतुलनात मधमाश्यांची भूमिका विशद करण्यात आली.

मधमाशी पालनाची देखभाल (Maintenance), बॉक्स व्यवस्थापन, राणी मधमाशीचे महत्त्व, रोग नियंत्रण, हंगामी काळजी आणि शेतीपूरक व्यवसाय म्हणून मधमाशी पालन कसे फायदेशीर ठरते यावर सविस्तर माहिती देण्यात आली तसेच सदर चा कार्यक्रम

आदरणीय अशोक भाऊ जैन चेअरमन जैन उद्योग समूह व आदरणीय अजित भाऊ जैन उद्योग समूह याच्या मार्गदर्शना खाली कार्यक्रम घेण्यात आला

उपस्थिती मान्यवर श्री प्रदीप वादाफळे, कृषी महाविद्यालय चेरअमन यवतमाळ

श्री दिगंबर भुयार, अमरावती

श्री विजय चोंडेकर , नासिक

श्री एस आर पाटील,प्रगतीशील शेतकरी जामनेर

श्री पी. टी. पाटील, नासिक

सर्व (सेवानिवृत्त) सहाय्यक वनसंरक्षक, संजय सोंजे कृषी विभाग जैन उद्योग समूह, दिपक चौधरी एनर्जी पार्क CSO,सुधीर पाटील GRF लक्ष्मण देशमुख
श्री राजेंद्र राणे,सल्लागार वन/वन्यजीव पर्यावरण विभाग जैन उद्योग समूह,जळगाव.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व ४० सहभागींकडून मधमाशी संरक्षणाची शपथ (Oath)

घेण्यात आली. सहभागींनी पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा केली -

“मी मधमाश्यांचे संरक्षण करीन, पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन देईन, कीटकनाशकांचा योग्य व मर्यादित वापर करीन आणि ‘No Bees – No Food’ हा संदेश समाजात पोहोचवीन.”

उपस्थितांनी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन राजेंद्र राणे वन/वन्यजीव पर्यावरण विभाग जैन उद्योग समूह,जळगाव.यांनी केले



नवभारत Chh. Sambhaji Nagar | 17 February 2026 | Page 6

किसानों की इनकम और फसल का दम, शहद से बढ़कर है मधुमक्खी का साथ

## खेती में 'पॉलिनेशन' का जादू

### जलगांव में गूंजा ‘नो बीज–नो फूड’ का नारा

■ जलगांव, ब्यूरो. पुणे के डायरेक्टर और इंडियन नेचुरल हनी बीज के विशेषज्ञ संजय मारने ने कहा कि खेती में पॉलिनेशन (परागण) के लिए मधुमक्खियों का अत्यधिक महत्व है. मधुमक्खियां बागों, सब्जियों और तिलहन फसलों में उत्पादन बढ़ाने के लिए बहुत उपयोगी हैं, जिससे किसानों की आय बढ़ाने में सीधी मदद मिलती है. वे जैन इरिगेशन के चेयरमैन अशोक जैन और जॉइंट मैनेजिंग डायरेक्टर अजीत जैन के मार्गदर्शन में आयोजित 'मधुमक्खी पालन जागरूकता कार्यक्रम' में बोल रहे थे. कार्यक्रम के दौरान मधुमक्खियों की विभिन्न प्रजातियों और उनके आर्थिक लाभों पर विस्तृत जानकारी दी गई. एपिस सेराना इंडिका, एपिस मेलिफेरा, एपिस डोरसाटा (रॉक बी) और एपिस फ्लोरिया (लिटिल बी) जैसी प्रजातियों के स्वभाव और शहद उत्पादन की क्षमता के बारे में बताया गया. विशेषज्ञों ने बताया कि केवल शहद ही नहीं, बल्कि मधुमक्खी का मोम, पॉलेन, रॉयल जेली, प्रोपोलिस और मधुमक्खी का जहर भी औषधीय और आर्थिक रूप से अत्यंत मूल्यवान है. मधुमक्खी पालन के रखरखाव, बॉक्स मैनेजमेंट, रानी मधुमक्खी की भूमिका और बीमारियों पर नियंत्रण के तरीकों को बारीकी से समझाया गया

### इकोलॉजिकल बैलेंस और शपथ

कार्यक्रम में 'नो बीज–नो फूड' के कॉन्सेप्ट को समझाते हुए बताया गया कि यदि मधुमक्खियां नहीं होंगी, तो मानव जाति के लिए भोजन का संकट खड़ा हो जाएगा. अंत में सभी प्रतिभागियों ने एक स्वर में शपथ ली कि वे मधुमक्खियों की रक्षा करेंगे, इको-फ्रेंडली खेती को बढ़ावा देंगे और कीटनाशकों (पेस्टिसाइड) का सीमित इस्तेमाल करेंगे. इस मौके पर यवतमाल एग्रीकल्चर कॉलेज के प्रेसिडेंट प्रदीप वादाफले, अमरावती के दिगंबर भुयार और नाशिक के विजय चौंडेकर सहित कई गणमान्य उपस्थित थे.

### पूरक व्यवसाय के रूप में अवसर

जैन इरिगेशन के एग्रीकल्चर डिपार्टमेंट के संजय सोनजे और एनर्जी पार्क के सीएसओ दीपक चौधरी ने बताया कि मधुमक्खी पालन को एक कॉम्प्लिमेंट्री बिजनेस (पूरक व्यवसाय) के तौर पर अपनाकर किसान अपनी आर्थिक स्थिति मजबूत कर सकते हैं. रिटायर्ड फॉरेस्ट अधिकारी पी. टी. पाटिल और प्रोग्रेसिव किसान एस. आर. पाटिल ने भी अपने अनुभव साझा किए. कार्यक्रम का प्रास्ताविक और आभार प्रदर्शन राजेंद्र राणे ने किया. इस पहल से जलगांव के किसानों में मधुमक्खी पालन को लेकर एक नई चेतना जागृत हुई है.

epaper.navbharatlive.com

**दिनांक : 25 डिसेंबर 2025**

🌱🐝🌱 **वसुंधरा फौंडेशन आणि नामपर्व फार्मर प्रोड्युसर कं. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने** 🐝








वृक्षारोपण कार्यक्रम 🌱🐝

श्री. तिरुपती बालाजी मंदिर, केतकावळे, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे येथे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला.

आजचा हा कार्यक्रम अत्यंत अविस्मरणीय, प्रेरणादायी व आनंददायी अनुभव ठरला.

या कार्यक्रमामध्ये 🌼 सोनचाफा या प्रजातीच्या रोपांची लागवड करण्यात आली, ज्यामुळे परिसर अधिकच हिरवागार, स्वच्छ व सुंदर झाला. हा वृक्षारोपण उपक्रम सर्व उपस्थितांसाठी मनमोहक व प्रेरणा देणारा ठरला.

या कार्यक्रमात Indian Natural Honeybees Pune यांच्या वतीने

Honeybees कॅलेंडर 2026 श्री. धनंजय भोसले (Mr. Bhosale) यांना भेट देण्यात आले.

तसेच उपस्थितांना 🐝 मधमाशांचे पर्यावरणातील अनन्यसाधारण महत्त्व,

🐝 मधमाशी पालनाबाबत सविस्तर माहिती,

आणि 🍯 मधमाशांपासून मिळणाऱ्या विविध उपउत्पादनांची (By-products) माहिती देण्यात आली.


या माध्यमातून राबवलेला जनजागृती व प्रबोधन कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

या सुंदर उपक्रमासाठी सहभागी सर्वांचे तसेच धनंजय भोसले सरांचे विशेष मनःपूर्वक आभार 🙏🌱🐝🌱🐝🌱






पुणे जिल्ह्यामध्ये सातेरी मधमाश्या पेट्यांमध्ये भरून देण्याचे दृष्टीने आदिवासी लोकांच्या गावोगावी जाऊन मीटिंग घेतल्या व त्यांना त्यामधून रोजगार उपलब्ध होईल या दृष्टीने इंडियन नॅचरल हनीबीज पुणे काम करीत आहे तसेच त्यांना लागणाऱ्या साहित्याचा पण पुरवठा केले जाईल याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली त्यांच्याकडनं रोजगार मिळत असेल तर आम्ही काम करण्यास तयार आहे असे त्यांनी स्पष्ट केले.


Indian Natural Honeybees Pune
Beekeeping Division
SUMMER TRAINING PROGRAM 2026
FREE TRAINING PROGRAM
Start Your Journey in Beekeeping!
What You Will Learn:
Introduction to Beekeeping
Equipment Required
Bees Management
Pollination Services
Honey Business
Limiting Factors
Live Farm Visit Experience
Training Schedule:
12th – 14th May, 2026
(Daily 1 Hour)
Early Morning
9:00 AM – 11:00 AM
Venue:
Uravade, Ambegaon (Tal. Mulshi)
District Pune
100% FREE TRAINING
Limited
25 Seats Only!
REGISTER NOW!
9422525024
Start Your Own Bee Business
Extra Income from Farming
Practical + Scientific Training
Lifetime Guidance
Turn Bees into Business – Start Small, Earn Big!

Save me!







Save me!
Let's Together, Save The Honey Bee's...
Indian Natural Honeybees


Indian Natural Honeybees
Anatomy of a Bee
Save me!
Let's Together, Save The Honey Bee's...
Who Lives in a Colony?
QUEEN
WORKER
DRONE
Life Cycle of a Honeybee


They seal cracks with propolis to keep water out and cluster together to maintain warmth.
One Village-One Family


Save me!
Indian Natural Honeybees


Indian Natural Honeybees
Anatomy of a Bee
Save me!
Let's Together, Save The Honey Bee's...
Who Lives in a Colony?
QUEEN
WORKER
DRONE
Life Cycle of a Honeybee
Let's take a look at the life cycle of a bee!

## 22. मध विक्री, प्रदर्शन व ब्रँड ओळख वाढवण्यात यश

### वनशेती-उत्पादक शेतकरी व व्यापारी उद्योजक मेळावा (१८ मार्च २०२५)




- आयोजन : सामाजिक वनीकरण वनवृत्त, पुणे
- उपस्थिती : ~४५० शेतकरी, महिला उद्योजक व अधिकारी/कर्मचारी
- प्रदर्शन : Indian Natural Honeybees, Pune तर्फे मधमाशी विषयक प्रदर्शन

माहिती दिली :

- मधमाशी पालन व परागीभवनातील भूमिका
- मधमाशी जाती - सॅटेली, मेलिफेरा, स्टिंगलेस
- उपकरणे व साहित्याची माहिती
- उत्पादने विक्री - मध, परागकण (Pollen), रॉयल जेली, प्रोपोलीस, मेण
    - ठळक मुद्दे :
    - उत्पादनांची विक्री व जनजागृती
    - शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग
    - काही शेतकरी प्रशिक्षण घेण्यासाठी उत्सुक

👉 अशा प्रकारे या मेळाव्यात मधमाशी संवर्धन व उत्पादनांबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली.







वन अधिकारी व कर्मचारी Pune यांच्या स्नेह मेळाव्यामध्ये मधमाशी विषयी सखोल माहिती देण्यात आली व त्याचप्रमाणे त्या ठिकाणी मधमाशी विषयी पोस्टर्स व प्रॉडक्ट याची सुद्धा माहिती देण्यात आली तसेच दाखवण्यात आली अत्यंत उत्स्फूर्तपणे सर्व अधिकाऱ्यांनी मधमाशी बद्दल उत्सुकता दाखवून विचारांची देवाण-घेवाण केले मधमाशी वाचवा हा उपक्रम करण्याबाबत सर्वांना आवाहन करण्यात आले त्याचबरोबर सर्वांनी मध सुद्धा घेतले इंडियन नॅचरल हनीबीज पुणे तर्फे स्टॉलही लावण्यात आलेला होता

- उत्पादने विक्री - मध, परागकण (Pollen), रॉयल जेली, प्रोपोलीस, मेण

**International Women's Day**




**International Women's Day निमित्त Rahibai Popare (बीजमाता), Ahilyanagar येथील Padma Shri पुरस्काराने सन्मानित शेतकरी यांची भेट झाली.**

**महिला बचत गटातील महिला National Bank for Agriculture and Rural Development संस्थेच्या Shivajinagar येथील कार्यालयात आल्या होत्या.**
**या प्रसंगी माझी आणि राहीबाई पोपरे यांची भेट झाली.**
**या भेटीत ग्रामीण शेती, बीज संवर्धन आणि महिलांच्या सक्षमीकरणाबाबत विचारांची देवाणघेवाण झाली.**
**राहीबाई पोपरे यांच्या अनुभवांमुळे उपस्थित महिलांना प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळाले.**
**जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने झालेली ही भेट अत्यंत प्रेरणादायी ठरली.**
**उत्पादने विक्री - मध, परागकण (Pollen), रॉयल जेली**

**लायन्स क्लब पुणे दिनांक 27 डिसेंबर २०२५**



लायन्स क्लब पुणे यांचे सर्व सभासदांना  दिनांक 27 डिसेंबर २०२५ रोजी मधुमक्षिका पालन या विषयावर इंडियन नॅचरल हनीबीज पुणे संचालक श्री संजय मारणे यांनी मधमाशांचे प्रकार मधमाशीपालन व उत्पादने यावर विस्तृत माहिती दिली तसेच सर्वांना मधमाशी 2026 चे कॅलेंडर देण्यात आले मधमाशी विषयी जनजागृती चा कार्यक्रम करण्यात आला

उत्पादने विक्री - मध, परागकण (Pollen), रॉयल जेली




ठिकाण : पुणे

दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी :

**संजय मारणे**